इति ६९
इ.ग्रं. २११४

# १८५७

(८७५)

# पहिलें स्वातंत्र्य-युद्ध

इति. ६९

भाई अशोक मेहता

किंमत ] [ १॥ रुपया

* * *

१८५७ स्वातंत्र्ययुद्धानन्तर देश-गौरव नेताजी सुभाषचन्द्र बोस यांच्या नेतृत्त्वाखालचा अझाद हिंद फौजेचा अमर लढा व नौ सैनिकांचा उठाव आपण पाहिला आहे. आपली माय-भूमि परत एका दिव्याच्या समीप आली आहे. ते महान् दिव्य पार पाडण्यास 'पहिलें स्वातंत्र्य युद्ध' मदत करील—नवा मार्ग दाखवील संघर्ष व संग्रामासाठीं सज्ज करील.

* * *

अनुवादक
भाई एस्. एम्. जोशी
वि. द. पटवर्धन

रु. १—८—०

इतिहास.
नं. १२
नगर वाचनालय सातारा
इ. ६९
५४१९०४९

१८५७

# पहिलें स्वातंत्र्य-युद्ध

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
नगर वाचनालय
ता. ......
सातारा.
इति.
६९

भाई अशोक मेहता

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088571

नगर वाचनालय सातारा
इति ६९
वाचक नं. - ८८५७१
पाने - ८८
किंमत - १।५०
दिनांक - ..............

किंमत ] [ १॥ रुपया

भाई जयप्रकाश नारायण

यांस

सप्रेम समर्पण

नगर वाचनालय
ता. ........
सातारा.

# लेखकाचे निवेदन

१९४० ते ४५ च्या माझ्या तुरुंगवासाच्या अवधींत ' मॉडर्न इंडिया ' नांवाचा जो मोठा ग्रंथ लिहिण्याची मी तयारी करीत होतो त्याचा ही पुस्तिका हा एक भाग आहे. ही पुस्तिका म्हणजे माझ्या मोठ्या पुस्तकाची बैठक आहे. तरीसुद्धां तिचा सद्यपरिस्थितीशीं असलेला संबंध स्पष्ट आहे.

ही पुस्तिका या स्वरूपांत प्रसिद्ध करावी कीं नाहीं याबद्दल बरेच दिवस निर्णय मी घेतला नव्हता.

**अशोक मेहता**

प्रकाशक :
**अप्पासाहेब पंत**
औंध पब्लिशिंग ट्रस्ट

मुद्रक :
**गंगाधर शंकर दाते**
" कलागृह छापखाना "
६६६ सदाशिव पेठ, पुणें २.

# १८५७

१८५७ सालचे बंडांतील रक्तपात, दुःख, अपमान, शौर्य याबद्दल हिंदी मनुष्य भावनाशून्यतेनें लिहूं शकत नाहीं. त्याच्या अंतःकरणांत कालवाकालव होऊन साहजिकच भावनांचे कढ लिखाणांत उतरतात. १८५७ हा शब्द त्यानें ऐकल्याबरोबर त्याचे मनावर एक विशिष्ट परिणाम होऊन एक ठिणगी उडते. बंडाच्या हकीकतींबद्दल बोलणें धोक्याचें आहे म्हणून लोक त्याबद्दल बोलत नाहींत. पण त्यांच्या स्मृतिगुहेंत या आठवणींच्या खांचखळग्यांचा आणि कोनाकोंपऱ्यांचा फार त्रास होतो. एका मिशनऱ्यानें एकदां कांहीं मुलांना बंडावर निबंध लिहिण्यास सांगितलें. एकूण एक मुलांनीं मिशनऱ्यांना कोरे कागद परत दिले. एकजुटीनें बिनदिक्कत दिलेला हा मूक नकार होता. आम्ही आमचे विचार आमच्यापाशींच ठेवले आहेत. ब्रिटिशांच्या लेखणींतून जे ढीगभर बंडाबद्दलचें वाङ्मय उपलब्ध झाले त्याकडे आम्ही मुद्दाम गप्प राहून दुर्लक्ष केलें. बंडाच्या सूडाचा संत्रस्त आणि संतत समंध लोकांच्या डोक्यांत थैमान घालीत असतो.

मात्र कोणीही इंग्लिश इतिहासकार बंडाचें अचूक ऐतिहासिक मूल्यमापन करू शकला नाहीं. ब्रिटिशांचे बाजूनें नमते घेणाऱ्या इतिहासकाराचे हाताशीं वादविवादासाठीं, कागदपत्रांचें ढीग पडलेले आहेत. परंतु हिंदी लोक, बंडांत यशाबरोबरच, युद्धांतील त्यांचे बाजूचा पुरावाहि गमावून बसले. बंडांत कामीं आलेल्या हिंदी हुतात्म्यांचे इभ्रतीवर शिंतोडे उडविण्याचें प्रयत्नांत ब्रिटिश लेखकांकडून कधींही कसूर झालेली नाहीं. त्यांनीं लिहिलेल्या अवास्तव इतिहासांतून नेमके निर्भेळ सत्य शोधून काढणें फार कठीण आहे. जवळ-जवळ शतक उलटून गेलें तरीही बंडांतील प्रमुख व्यक्ती, त्यांच्या स्वभावांच्या रूपरेषा, व मनांतील प्रभावी कल्पना यांचा कयास बांधणें सोपें नाहीं.

बंडाचे जुजबी अहवाल पुष्कळ असले तरी समाधानकारक असा, अखेरचा

निरोप घेणाऱ्या, अस्ताचल युगाचा संधिप्रकाश ज्यांत दृग्गोचर होईल असा एकहि इतिहास नाहीं. गंभीर घडामोडींनीं भारावलेल्या या कालाबद्दल ग्रंथ-रचना फक्त हिंदी मनुष्यच करू शकेल. परंतु फारच थोड्या हिंदी लोकांनीं या कामास हात घातला आहे. श्री. विनायकराव सावरकर मात्र यास अप-वाद आहेत. त्यांनीं जुनी दप्तरें आणि जुने कागदपत्र संशोधनाच्या प्रकाशांत आणून एक मौल्यवान ग्रंथ लिहिला आहे. परंतु तो अपरिपक्व आहे असें वाटल्यावांचून राहत नाहीं. तारुण्यसुलभ असे देशप्रेमाचे, भावनांचे आणि काव्याचें उमाळें त्यांत आढळतात. जागोजागीं ऐतिहासिक विश्लेषण व भावनोत्कटता एकमेकांत मिसळून पुन्हां वेगळ्या झालेल्या आहेत. समतोल इतिहासापेक्षां त्यांत जाहीरनाम्याप्रमाणें वाटणाराच भाग अधिक आहे. बंडाचा निःपक्षपाती इतिहास अजरामर इतिहासकारांची वाट पहात आहे.

या पुस्तकांत बंडाचें समग्र वृत्त देण्याचा यत्न केलेला नाहीं. हिंदी राष्ट्रीय-त्वाच्या उत्क्रान्तीमध्यें व लोकसुधारणांत बंडाचें स्थान काय आहे एवढेंच दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्थात अशा पुस्तकांमध्यें अपूर्णत्वाची सारखी जाणीव होणें अपरिहार्य आहे.

आमच्या राष्ट्रीय मनोवृत्तींवर तापलेल्या लोखंडानें डागावें तसें जें सत्य डागले गेलें आहे, त्याकडे एकसारखें लक्ष केंद्रित करण्याचा मात्र आम्ही यत्न केला आहे.

# प्रकाशकाची भूमिका

माझे स्नेही व काँग्रेस समाजवादी पक्षाचे नेते भाई अशोक मेहता यांच्या १८५७ या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद प्रसिद्ध करण्यांत मला आनंद होत आहे.

हा अनुवाद भाई एस. एम्. जोशी व भाई विठ्ठलराव पटवर्धन यांनीं करण्यांत एक औचित्य आहे. आज भाई एस. एम्. जोशी यांच्या तपश्चर्येचे फळ महाराष्ट्रांतच नव्हे तर कराचीपासून मद्रासपर्यंत व मुंबईपासून दिल्ली-पर्यंत संघटित होत असलेल्या राष्ट्र-सेवादलाच्या स्वरूपामध्यें व्यक्त होत आहे. भाई विठ्ठलराव पटवर्धन यांचा परिचय महाराष्ट्राला अजून पूर्णत्वानें झाला नाहीं. बेचाळिसच्या स्वातंत्र्य युद्धांत त्यांनीं उडी घेतली व प्रगटपणें व अज्ञातवासांत शेवटपर्यंत कार्य केले. पहिल्या स्वातंत्र्य युद्धाचा इतिहास दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धांतील आघाडीवरच्या वीरांनीं आपणांस दिला आहे.

बेचाळिसच्या स्वातंत्र्य युद्धांतून देशांत नवचैतन्य निर्माण झालेले आहे. चाळीस कोट जनतेच्या शक्तीचा साक्षात्कार झालेला आहे. स्वसामर्थ्याच्या जाणीवेंतून उत्पन्न झालेला आत्मविश्वास वाढविण्याचें, स्वातंत्र्यउत्सुकतेत असलेली ' कामगार किसान प्रजाराज्य ' ही काँग्रेसची अधिकृत भूमिका सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोंचविण्याचें 'औंध प्रकाशन संस्था' हे एक साधन आहे. स्वातंत्र्याची आकांक्षा वृद्धिंगत करणें, कामगार-किसान-प्रजाराज्य या ध्येयावरील निष्ठा बळकट करणें व राष्ट्राच्या स्वाभिमानाची जोपासना करणें हे आमचें ध्येय आहे. या प्रयत्नांत महाराष्ट्रांतील जनता सहकार्य करील असा मला विश्वास वाटतो.

पुस्तकाच्या आरंभीं श्री. वसंतराव बापट यांची एक कविता आहे. महाराष्ट्रांत त्यांच्या कविता आज सर्वमुखीं झाल्या आहेत. त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

औंध—
दिनांक २२-१०-४६

आपला,
अप्पा पंत

नगर वाचनालय
ता. ......
सातारा.

# १८५७

(१)

ते धन्य खरोखर सत्तावनचे वीर
जे स्वातंत्र्यास्तव झाले सर्व फकीर
झुंजार झुंजले...फिरले परि तकदीर
—काल्पीस तयांचीं तुटूनी पडलीं माथीं
—झांशीस तयांचे पडले मातित साथी
खंजीर जहाली गनिमांची जंजीर !

(२)

बाहूंत जयांच्या नाचत होती बिजली
ती रणशय्येवर सेना अपुली निजली
ती ज्योत अखेरीस मोठी होऊन विझली
—परि चिरनिद्रेंत पडती स्वप्नें त्यांना
—कीं वंशज अमुचे देउनियां बलिदाना
हीं सुफलित करितील बीजें येथें रुजली !

(३)

रे ! शंभर वर्षें होतिल पुरतीं आतां
ती बेडी अजुनी रुतते आहे हातां !
कां व्यर्थ तयांची स्तवनें-कवनें गातां ?
—तें दूरच आहे अजुनी किती मंदीर
—अन् म्यानांतच तरि गंजति रे खंजीर
ती अजुनी विजनी झुरते आहे माता !

वसंत बापट

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | बंडाची कारणें | १ |
| २ | बंडाची पार्श्वभूमि | १७ |
| ३ | बंडाचा विस्तार | २६ |
| ४ | बंडाचें स्वरूप | ३५ |
| ५ | बंडाचे नेते | ४६ |
| ६ | बंडांतील क्रौर्य | ५३ |
| ७ | बंडाच्या अपयशाची कारणें | ५८ |
| ८ | बंडाचे परिणाम | ६७ |

... वाचनालय, सातारा

# पहिलें स्वातंत्र्ययुद्ध

## बंडाची कारणें : : १

१८९० चें सुमारास हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या विचार-प्रवाहांच्या सहस्रावधीं शक्तींमुळें जनमनाची ओढाताण झाली होती. १८९७ चे सुमारास या सहस्रावधी शक्ति प्रबल होऊन त्यांचा स्फोट केव्हां होईल हें सांगता येणें शक्य नव्हतें. या पूर्वींच्या शंभर वर्षांत ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकापासून उत्तरेच्या बर्फाच्छादित शिखरांपर्यंत येऊन पोहोंचली होती. हिंदुस्थानांतील या शक्तींच्या समुद्रमंथनांतून जनमनामध्यें ज्या आकांक्षा निर्माण झाल्या, त्यावरच स्वातंत्र्यभावना विराजमान झाली होती (१८४९). लाडवा–अंगुल सारख्या ठिकाणीं राजेरजवाडे ब्रिटिशांशीं झगडले होते (१८४७). हैदराबाद, त्रावणकोर, कोचीन, वगैरे ठिकाणचे दिवाण परकीय सत्ताधीशांविरुद्ध प्रतिकारासाठीं उठले होते. ब्रिटिशांच्या वाढत्या प्रांताभिलाषानें सर्व लोकांमध्यें अशांतता निर्माण झाली होती.

ब्रिटिशांनीं जिंकलेल्या भागास बरीच संस्थानें जोडून घेतली, व जहागिऱ्या जप्त केल्या. यामुळें बेवारस झालेल्या लोकांचें मनांत सूडाची भावना निर्माण झाली व अशा लोकांमधून नानासाहेब, झांशीच्या राणीसाहेब, औधच्या बेगमसाहेबा अशांसारखे कर्तृत्ववान पुढारी लोकांपुढें आले. त्यांच्यांमागे त्यांच्यासारखेच असंतुष्ट असलेले

लहानमोठे लोक होते. त्यांच्या या असमाधानास परिणामकारक असें तोंड फोडण्यासाठीं नेत्यांनीं प्रयत्नास सुरवात केली. "हिंदुस्थान जिंकण्यास जरी सोपा असला, तरी त्यावर सुयंत्र राज्य करणें मात्र त्यामानानें फार कठीण आहे."[१]

कांहीं वर्षें कमीअधिक प्रभावी उठाव होतच होते. सहाराणपूर जिल्ह्यांत गंभीर स्वरूपाचा उठाव झाला होता. दिल्ली भागांत झालेला उठाव लहानसहान नव्हता. यापेक्षां कमी प्रभावी उठाव मिरत आणि मुरादाबाद येथें झालें होते. 'ब्रिटिश राज्य संपलें, इंग्रजांना जुमानू नका' अशी संघटनगर्जना उत्तर हिंदुस्थानांतील इलाख्यांतून मोठ्या उत्साहानें व हर्षानें पुकारली जात होती. रामोशांचा उठाव होतांच पुण्याकडील जनता बिथरली, (१८२६–२७) 'कोले' लोकांचा बिहारमधील उठाव (१८३१–३) दडपून टाकण्यासाठीं असंख्य लोकांचे बळी घेतले गेले व पांच हजार चौरस मैल जमिनीची नासधूस झाली. सावंतवाडीचा उठाव येवढ्या गंभीर स्वरूपाचा होता कीं, औट्रमला त्याच्या बंदोबस्तासाठीं दहा हजार सैनिकांचा उपयोग करावा लागला. इतके होऊनही ती आग १८५७ पर्यंत धुमसतच राहिली. १८४८ सालीं कांग्रा, जासवार, आणि दातारपूर येथील राजे व नागपूरचे वजीर यांनीं बंडाचें निशाण उभारून 'ब्रिटिश राजवट संपली' अशी घोषणा केली. या लोकांना गुरू नानकांचे वंशज व शिखांचे धर्मगुरू बेदी विक्रमसिंग यांच्या मदतीचें पाठबळ मिळून बंडाची प्रतिष्ठा वाढली. अशा तऱ्हेनें ब्रिटिश राज्याच्या नायनाटाची कल्पना लोकांच्या डोळ्यासमोर अखंड होती.

---

1 William Archer : India and the Future. P. 42.

ब्रिटिश सत्तेविरुद्ध ' भयंकर स्वरूपाचें गुप्त युद्ध ' असंख्य लोक करीत होते; हे असंख्य लोक कोण याचा मात्र ब्रिटिशांना पत्ता नव्हता.

" ज्या ज्या वेळीं आमच्या हत्यारांचे बाबतींत दुर्दैवानें कांहीं घोटाळा होऊन, अगर सैन्यांत बंडाळी होऊन लोकांना संधी मिळे त्या त्या वेळीं परिपत्रकें आणि घोषणा यांचा सुळसुळाट होई. हा परिपत्रकांचा आणि घोषणांचा प्रचार विश्वास बसणार नाहीं इतक्या व्यवस्थितपणें होई. अशी परिपत्रकें आणि घोषणा लोक मोठ्या उत्साहानें वाचीत. ब्रिटिश हे काफर, लुटारू आहेत, हिंदुस्थानची संपत्ती लुटण्यासाठीं, हिंदुस्थानांतील धर्म आणि संस्कृती यांचा नायनाट करण्यासाठीं हे जुलमी लोक येथें आलें आहेत, अशा तऱ्हेचे उल्लेख इंग्लिश लोकांच्याबद्दल करण्यांत येत असत. हा सर्व प्रचार विशेषेंकरून हिंदी शिपायांत केला जात असे. आणि माझा जेथें जेथें संबंध आला तेथें तेथें माझ्या असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं, ' तुमच्यावर जुलूम करणारे इंग्लिश थोडे आहेत. त्यांना ठार करा ' असा उपदेश शिपायांना करण्यांत येत असे. उलटपक्षीं ब्रिटिश लोक मात्र अचल, प्रबल आणि अजिंक्य राहिले."

पंजाबमधील युद्धांत शिखांनीं केलेल्या प्रभावी प्रतिकारामुळें व अफगाणिस्तानांतील युद्धांत ब्रिटिशांना पळतां भुई थोडी झाल्यामुळें ' ब्रिटिश अजिंक्य आहेत ' हा भ्रम नाहींसा झाला. प्लासीच्या लढाईस एक शतक पुरें होण्याचे सुमारास ब्रिटिश सत्तेचा अंत होईल असा सर्वसाधारण समज पसरला होता. प्रवाहाच्या दिशेनें जाणाऱ्या जहाजाच्या शिडांत वारा भरल्यावर तें जसें जास्त वेगानें जातें, तसें

वरील समजामुळें लोकांचें मनांतील स्वातंत्र्यप्राप्तीचा निश्चय दृढतर झाला व स्वातंत्र्यलब्धांतील शक्तींमध्यें सामील होऊन फौजेचे शिपाई आपल्या नशिबाची परिक्षा पाहण्यास तयार आहेत असें समजतांच स्वातंत्र्यप्राप्तीच्या आशेस सर्वसमावेशी अशा महत्त्वाकांक्षेचें स्वरूप प्राप्त झालें.

आपण काय करतो आहोंत हे ध्यानांत येण्यापूर्वीं शिपायांनीं ब्रिटिशांना साम्राज्य मिळवून दिले होते. देशामध्यें ब्रिटिश सत्ता जसजशी सार्वभौम होत गेली, तसतशी शिपायांची परिस्थिति हलाखीची होत गेली. " शिपायांनीं जो विजय ब्रिटिशांना मिळवून दिला, तोच त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीस कारणीभूत झाला."[1] शिपायांच्या शक्तीमुळें ब्रिटिश सरकारला त्यांचेबद्दल अत्यंत अविश्वास वाटत असें. शिपायांच्या प्रत्येक कंपनींत दोन किंवा तीन हिंदी अधिकारी असत. हे अधिकारी जर कर्तृत्ववान असले, तर त्यांना इनाम देण्याचें मिषानें त्यांना सेवानिवृत्त करून त्यांचा पूर्ण पगार चालू ठेवीत. शिपायांना फक्त गोऱ्या अधिकाऱ्यांबद्दलच आदर, कौतुक वाटावें अशी अपेक्षा असे. गोऱ्या अधिकाऱ्यांचे ऐवजीं ज्या हिंदी अधिकाऱ्यांबद्दल प्रेमभाव अगर आदर शिपायांचे मनामध्यें निर्माण होतो आहे असे वाटे, त्यांना बडतर्फ करण्यांत येई."[2] या धोरणामुळें हिंदी शिपायास पायदळांतील सुभेदार म्हणून जास्तींत जास्त दरमहा १७४ रु. पगार मिळू शके. यापेक्षां थोडा जास्तच पगार गोऱ्या नव्या रंगरूटास मिळत असे. वझीरखान यांनीं सर जॉर्ज माल्कम कॅंप्बेल यांना " मी

1 T. Rice Homes : A History of Indian Mutiny P. 49.
2 V. Jacquemont : Letters from India. P. 23.

रिसालदार म्हणून सैन्यांत नोकरीस लागलों. मी अजून रिसालदारच आहे व कायम रिसालदारच राहीन. यापुढील बढती काळ्या माणसास मिळत नाहीं"[१] असें किंचित् दुःखानें सांगितलें. वझीरखान यांच्या या शब्दांत एका सबंध वर्णाचें दुःख सामावलें आहे. यापेक्षांही वाईट गोष्ट म्हणजे पावलोपावलीं शिपायांच्या स्वाभिमानाची पायमल्ली केली जाई.

"कवाइतीचे वेळीं शिपायांना शिवीगाळ करणें, अत्यंत अश्लील शब्दांत त्यांना बोलणें, हें तर नेहमींचेंच होते" असें फ्रेडरीक जॉन शोअर म्हणतात.

सैन्यांत बढती तर मिळत नसेच. परंतु शिपायांची स्थिती दिवसें-दिवस, हळूहळूं खालावत चालली होती. शिपायांच्या कर्तबगारीमुळें ब्रिटिश सत्तेच्या सीमा वाढत होत्या. आणि शिपायांना घरादारापासून जास्त दूर जाऊन लढावें लागत होते व त्यासाठीं त्यांना भत्ताही मिळत नसे. सिंध आणि पंजाब हे प्रांत ब्रिटिश मुलूखास जोडल्या-मुळें शिपायांचें आर्थिक नुकसान झालें. भत्ता बुडाल्यामुळें ते नाखूष झालें. "पगारवाढीसाठीं त्यांनीं संप करण्याचें ठरविलें व सर्वानुमतें गुप्तपणें एक सशस्त्र संघ स्थापन केला."[२]

ज्या शिपायांची भरती फक्त हिंदुस्थानांत नोकरी करण्या-साठीं केली होती, त्यांच्यापैकीं अधिकाधिक शिपायांना हिंदुस्थाना-

---

1 G. Campbell : Memoirs of my Indian Career pp. i 85.

2 G. W. Forrest : A History of Indian Mutiny pp. iii 20.

बाहेर लढण्यासाठीं पाठविण्यास सुरवात झाली. बरॅकपूर येथील शिपायांनीं १८२४ सालीं ब्रम्हदेशांत जाण्याचें नाकारलें व हट-योग्याच्या निर्धारानें बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव सहन केला. त्यांनीं आपल्या निर्धाराला मृत्यूची मोहोर केली होती. गव्हर्नर-जनरलनें 'जनरल सर्व्हिस एनलिस्टमेंट ॲक्ट' १८५६ सालीं अंमलांत आणून हिंदी शिपायास सांगण्यांत येईल तेथें लढण्यास भाग पाडून हिंदुस्थानाबाहेर लढण्याचे नाकारण्याचा हक्क हिरावून घेतला. त्यामुळें शिपाई संतापले. टांकाच्या एका फटकाऱ्यानें 'इंडियन आर्मी'चें 'इंपीरियल आर्मी' मध्यें रूपांतर केलें गेलें. 'बंगाल आर्मी' मधील शिपायांना पत्रें फुकट पाठविणें, जकातीची सूट, या सारख्या सवलतींची बरेच दिवसांपासून संवय झाली होती. या सवलती आकस्मिकपणें काढून घेण्यांत आल्या. शिपायांनीं खिस्तीधर्म स्वीकारावा म्हणून जे प्रयत्न झाले त्यामुळें शिपायांचा संताप अधिकच वाढला "स्वतःचा धर्म सोडणाऱ्या प्रत्येक शिपायास हवालदार, प्रत्येक हवालदारास सुभेदार, प्रत्येक सुभेदारास मेजर याप्रमाणें बढती देऊं"[1] अशी आश्वासनें गोरे अधिकारी देत असत. यामुळें व गाय आणि डुक्कर याची चरबी लाविलेली काडतुसें, इत्यादि तक्रारीमुळें शिपायांचें मनांत खळबळ माजली.

आकस्मिकपणें व लबाडीनें औध ब्रिटिश मुलुखास जोडला गेल्यानें या सर्व असंतोषास विशिष्ट गंभीर स्वरूप प्राप्त झालें. 'बंगाल आर्मी' मध्यें येणारे साठ टक्के शिपायी औधचे रहिवासी

---

1 A Hindu of Bengal : Causes of Indian revolt, (1857)

असत. त्यांची ती मातृभूमी होती. अशा तऱ्हेनें शिपायांची राष्ट्रीय-भावना दुखावली गेली. हें नवें असमाधान वैयक्तिक वा संकुचित नव्हतें. या असमाधानामागें हृदयाची आकांक्षा होती, व त्या आकांक्षापूर्तीला हें आवाहन होतें. स्वातंत्र्यमंदिराच्या उंबरठ्यावर पाऊल टाकण्यासाठीं त्याचा आत्मा तळमळत होता.[1] लोकांची परंपरागत राजनिष्ठा, मोंगल सम्राट, नानासाहेब, औधच्या बेगम साहेबा इत्यादिकांच्या भोंवतीं केंद्रित झाली होती. लोकांचें नवनिर्मित देश-प्रेम यांचें आधारानेंच वाढीस लागलें होते. जाणत्या लोकांना क्रांति-गर्जनेचा ध्वनी अस्पष्ट ऐकूं येऊं लागला होता.

आतांपर्यंत निर्माण झालेल्या असंतोषाच्या शक्तींनीं मूळ धरलें होते. या सर्व शक्तींच्या एकजुटीमुळें त्यांच्या स्फोटक परिणामांची घटका जवळ आणली.

राज्यशकट हांकणारी शासनपद्धती अपुरी तर होतीच पण प्रभावी-ही नव्हती. जेव्हां एखादा नवीन प्रांत ब्रिटिश मुलुखास जोडला जाई, तेव्हां या शासनपद्धतीवर एवढा ताण पडे कीं, त्यामुळें 'लोकांचें मनामध्यें विरोधी भावना निर्माण होऊन शेतकरी लोक दंगेधोपे करीत' असें कर्नल मालसन यांनीं म्हटलें आहे. कित्येक जिल्ह्यांतून प्रतिकार कायम चालू असे. आणि त्या जिल्ह्यांत ब्रिटिश राजसत्तेचा स्वीकार राजीखुषीनें कधींच झाला नाहीं. वेगवेगळ्या ठिकाणीं निघणारे कमी-

---

1 The Annexation of Oudh was followed by the disbanding of the State Army. 6000 men were rendered idle—every sepoy was intimately affected by the enforced unemployment caused to his relatives.

अधिक तीव्रतेचे क्रांतीचे सूर क्रांतीच्या संग्रामसंगीतामध्यें एकजीव होण्यासाठीं अधीर झाले होते.

होल्ट आणि मॅकेन्झी यांनीं केलेल्या सुप्रसिद्ध टिपणांत शासन-पद्धतीमधील गोंधळ स्पष्टपणें दृष्टीस पडतो. "सरकारनें लोकांची मनें समजावून न घेता त्यांच्यावर न मानवण्यासारखे कायदे लादून त्यांना चमत्कारिक परिस्थितींत टाकले. त्यांच्या मालमत्तेच्या बाबतींत मोठा गोंधळ निर्माण केला गेला. कारण करवसुलीचें धोरण कसलीही चौकशी न करतां ठरविण्यांत येई आणि त्या बाबतचे न्यायखात्याचें निर्णय सारावसूलीबाबत कसलीही माहिती नसता घेण्यांत येत."

जुने दिवस आणि सराव झालेल्या जुन्या पद्धती बुडल्यामुळें लोकांच्या इतकीच हळहळ शिपायांनाही वाटत होती. जुनी संस्कृती गेली, जुना दिमाख गेला. परंपरेनें येणाऱ्या अधिकाऱ्यांचा रुबाब गेला. पायघोळ रुबाबदार अंगरखे गेले, जरीच्या वेलबुट्टीचे चढाव, चित्रविचित्र रंगांचीं पागोटीं आणि पगड्या गेल्या. दरबारी रुबाबांचा हुक्का गेला. टप्पेदार सुस्वर हास्य गेले. सरकारी कागदपत्रांत येणारे वाङ्मयीन उल्लेख गेले. वक्तृत्व आणि वक्रोक्ती गेली. या सर्वांचे जागीं राबवून कामें करून घेणारे परकीय अधिकारी आले. त्यांतल्या त्यांत चांगले समजले गेलेले बड आणि थॉमसनसुद्धां "संधि मिळेल तेव्हां हिंदी लोकांचा उपमर्द करीत असत."

न्यायदान, वसूली, व पोलीस खात्यांत काम करणाऱ्या हिंदी लोकांचा, विशेषतः जुन्या सन्मान्य घराण्यांतील मंडळींचा क्रान्तीच्या कार्यास पाठिंबा असे. यापैकीं धैर्यवान् लोक क्रांतीच्या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेत. व क्रांतीचें पुढाऱ्यांचें कार्यावर गोप्याचें पांघरूण घालीत.

नगर वाचनालय सातारा

स्वीकृत

आर्थिक पिळवणुकीनें या असंतोषाच्या या धडधडणाऱ्या आगींत तेलच पडलें. जमिनीच्या प्रश्नाबाबतची अनिश्चितता लोकांना फार जाचक वाटत होती. सरकारी अधिकारी खाजगी देवधेवींचे व्यवहार बेकायदेशीर ठरवीत. आणि कोर्टानें दिलेल्या निकालाबाबतहि ढवळा-ढवळ करीत. उदा. मणीपूरच्या राजाकडून त्याच्या इनामदारींतून १९८ पैकीं ११६ खेडीं काढून घेण्यांत आलीं. सध्यांचा संयुक्तप्रांत, पूर्वींचा वायव्य सरहद्द प्रांत, या इलाख्यांतील दुसऱ्या राजाच्या २१६ खेड्यांपैकीं १३८ खेडीं काढून घेण्याचा हुकूम करण्यांत आला होता. परंतु यापेक्षांही मोठा भाग घशांत घालता यावा या धोरणानें सदर बोर्डानें कलेक्टराकडून हुकुमाची अंमलबजावणी तहकूब करविण्यांत आली.

दत्तक रद्दीच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यांत येऊन बऱ्याच जमिनदाऱ्या व इनामदाऱ्या वारस नसल्यामुळें सरकारजमा करण्यांत आल्या. सर्व मालमत्ता वडील अपत्यास मिळण्याची प्रथा बंद झाल्या-मुळें मालमत्ता सर्व वारसांत वांटली जाऊ लागली व यामुळें थोडी-बहुत मालमत्ता राखून असलेले लोकही हळूहळू दरिद्री झाले. याच्या जोडीला करवसुलीच्या जुलमी पद्धतीनें प्रजा चरकांतून निघणाऱ्या चिपाडाप्रमाणें पिळून निघाली. पानिपत जिल्ह्यांत सारावसुलीसाठीं १३६ स्वार नेमले होते. परंतु यासबंध जिल्ह्यासाठीं मुलकी पोलीस मात्र २२ च होते.

वायव्य सरहद्द प्रांतांत जारी असलेल्या जुलमी करवसूलीच्या पद्धतीप्रमाणें ६६$\frac{2}{3}$% सरकारसाठीं १८% नुकसान भरपाईखातर तालुकादारांसाठीं आणि १९$\frac{1}{3}$% फायदा म्हणून जमिनीच्या मालका-

साठीं देण्यांत येत असत. सर्व जमीन निर्दय सावकारांचे हातांत गेली होती. ज्या ज्या सावकारांनीं आणि व्यापाऱ्यांनीं गहाण म्हणून वा अडवणुकीनें विकत म्हणून जमिनी व इतर मालमत्ता बळकाविली होती "त्यांचेबद्दल लोकांचें मनांत इतका द्वेष निर्माण झालेला होता कीं, बंड सुरू होतांच यापैकीं कित्येकांना देशोधडीस लावण्यांत आले. कित्येकांचे तर खून पडले."

औधच्या तालुकादारांचे अपरिमित नुकसान झालें. औध खालसा करतेवेळीं त्यांचे ताब्यांत २९,९४३ खेडीं होतीं, त्यांपैकीं ३९,०६,९१९ रु. वसूलाची १३,६४० खेडीं तालुकदारांचे ताब्यांत ठेवण्यांत आली. बाकीची ११,९०३ खेड्यांचा ३२,०८,३१९ रु. चा वसूल परस्पर करण्यांत आला. कांहीं तालुकदारांची अर्धीमाधिक आणि कांहींचीं सर्व खेडीं त्यांच्यापासून परत घेतलीं असें हेन्री लॉरेन्स यांनीं लॉर्ड कॅनिंग यांना लिहिलें आहे. यामुळें शेतकऱ्यांचा कांहीं फायदा झाला आहे असेंहि त्यांना वाटलें नाहीं. डोईजड कर आणि जकाती यांनीं शेतकऱ्यांना वेड लागण्याची पाळी आली आहे. "जॉन लॉरेन्स, थॉम्सन, एडमन स्टोन्स यांच्यासारख्या माणसांनींच हिंदुस्थानला या अवस्थेंस आणलें" असें, बंड होतांच सर हेन्री यांनी म्हटल्याचें ऐकिवांत आहे.

न्यायदान स्थगित झालेलें, जमिनीच्या करारावाबत गोंधळ माजलेला, अशा परिस्थितींत मालकीची जमिन असून, ४० ते ९० टक्के व्याजानें सुद्धा शेतकऱ्यास कर्ज मिळणें मुष्कील होऊन बसलें होतें. या गोंधळांत चलनाबाबतच्या सरकारी धोरणामुळें भरच पडली. हिंदुस्थानांत बरेच दिवस चाललेली ही हलाखीची परिस्थिति १८२९

ते १८५४ पर्यंतच्या पडत्या किंमतीचे मुळें होती असें प्रो. थॉम्सन यांनीं म्हटलें आहे. हा पूर्वापार पद्धतीऐवजी, नवीन चलनाची पद्धती अंमलांत आल्यामुळें चलनमागणी वाढून त्याचा तुटवडा पडला, या गोष्टींचा परिणाम होय. १८३५ च्या कायद्यान्वयें चांदीच्या चलनावर हिंदुस्थानची अर्थव्यवस्था[1] उभारली होती. परंतु याचवेळीं चांदीच्या जागतिक उत्पादनांतच घट आली. म्हणून हिंदुस्थानाला वाढत्या हलाखीच्या परिस्थितीस तोंड द्यावें लागलें. तेव्हां लोकांनीं, " कंपनी के अमलमें 'रोझगार' नही," असें म्हणावें हें साहजिक होते.

ब्रिटिश सत्तेचे हिंदुस्थानच्या लोकांवर झालेले आर्थिक परिणाम दीर्घकाल टिकणारे आणि फार गंभीर स्वरूपाचे होते. या परिणामाच्या लाटेबरोबर देशभर हलाखी आणि दुःख पसरलें. आदिवासींचें उदाहरण तर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. अनादिकालापासून पारतंत्र्य माहीत नसलेले, दऱ्याखोऱ्यांत राहणारे हे लोक ब्रिटिश सत्तेच्या तडाख्यांत सांपडले. त्यांच्या परंपरागत हक्काकडे दुर्लक्ष करून पुढारलेल्या जातीचे लुच्चे लोक त्यांचेवर कायदेकानूंची, करवसूलीची अंमलबजावणी करीत व त्यांचे श्रम आणि वित्त यांचा अपहार करीत. आपले आर्थिक हक्क आणि स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं आदिवासी लोक मोठ्या शौर्यानें लढले. टामारचे लोक १७८९ सालींच बंड करून उठले, आणि त्यांचा प्रतिकार कित्येक वर्षें कायम राहिला. १७९४, १८११, १८१७, १८२०, १८३२ या सालांत त्यांच्या प्रतिकारानें जास्त नेट धरला. होश, मुंडास, आणि ओराओन्स, येथें जमिनींबाबतच्या हक्कांची पायमल्ली झाल्यामुळेंच शेवटचे दोन्हीं उठाव

1 Economic History Review 1936.

झाले, असें गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलचे एक सभासद मि. ब्लन्ट यांनीं आपल्या टिपणांत म्हटलें आहे. या उठावांचा बीमोड करून त्यांना शरण यावयास लावून गुलामगिरी पत्करणें ब्रिटिशांनीं भाग पाडलें.[1]

संताळांची अवस्था अवस्था आदिवासींप्रमाणेंच झाली. १८९४चें सुमारास असंतोषाची कांहीं पटलें थोडा वेळ दूर होऊन लोकांस धीर आणि आशा वाटूं लागली होती. त्यांच्या देशाभोंवताली २०० मैल लांबीचे आगगाडीचे रूळ टाकण्यांत आले, व हें काम चालू असतांना त्यांच्यापैकीं बऱ्याच लोकांस कामधंदा मिळाला. स्त्रिया, पुरुष, मुलें सर्वांना काम लागले. सावकाराच्या गुलामगिरीच्या शृंखला सैल झाल्या. १८९९ हें सुबत्तेचें साल होतें. पीक चांगलें आलें, धारण चांगली होती, दिवस चांगले आले आणि संताळांनीं स्वातंत्र्यासाठीं उठाव केला. धनुष्य-बाण आणि भाले घेतलेल्या तीस हजार लोकांनीं कलकत्ता शहरावर शिस्तींत हल्ला चढविला. ब्रिटिश अंमलाच्या सुरुवातीचा ज्यांनीं जुलूम जबरदस्तीसाठीं फायदा घेतला होता त्यांचेवर संताळांचा दांत होता. उदा. नारायणपूरच्या जमिनदारास कित्येक गोष्टींचा जाब विचारून त्याचा सूड घ्यावयाचा होता. चार आणे असा पुकार करून त्याचे पाय आणि गुडघे तोडले. आठ आणे असा पुकार करून त्याच्या मांड्या तोडल्या, बारा आणे पुकारून त्याचे हात तोडले, व सोळा आण्याचा, पुरेपूर फेडीचा, पुकार करून त्यांनीं त्याचा शिरच्छेद केला.

दहा हजार संताळांना ठार करून सरकारनें हें बंड रक्तांच्या

1 cf. Sarat Chandre Roy : The Mundas.

पुरांत बुडविलें. क्षणभर उडालेली स्वातंत्र्याची ठिणगी विझून गेली. एकामागून एक येणाऱ्या आर्थिक घडामोडींनीं हिंदुस्थानांतील बसलेली घडी विस्कळित केली होती. डलहौसीच्या कारकीर्दींत ब्रिटिश सत्तेमुळें जी सामाजिक ढवळाढवळ झाली; तीसुद्धां फार त्रासदायक ठरली. त्यानें आठ वर्षांत सात प्रांत ब्रिटिश सत्तेस जोडले. हिंदी लोकांचें हातांत शासनसंस्थेचे नेतृत्व असलेले प्रांत आधींच थोडे होते. ते क्षेत्र यामुळें अधिकच संकुचित झालें. नवीन जोडलेल्या प्रांतांत शांतता प्रस्थापित करतांना आणि राज्याची घडी बसवितांना, श्रीमंत आणि वजनदार मंडळीचेवर खरोखर अन्याय होत असे. डलहौसीनें केलेल्या कायद्यामुळें सरकार आणि प्रजा यामधील अध्याहृत बंधनांची पायमल्ली झाली [ Act 21 Geo. III, C 70 ( 1781 ) and 37 Geo. III, C 142 ( 1797 ) ]. या कायद्यान्वयें असें ठरलें होतें• कीं हिंदी लोकांचे धर्म आणि रीतीरिवाज यांचेआड कायदे येणार नाहींत. डलहौसीनें केलेल्या सामाजिक कायद्यांनीं वरील कायद्याचे हेतूंच नव्हे तर ते कायदेच अक्षरशः मोडल्यासारखें वाटलें. १८५७ पूर्वींच्या आठ दहा वर्षांत अज्ञान हिंदी लोकांचा सुद्धां त्यांचे मनाविरुद्ध पाश्चात्य वृत्तीशी संबंध आला. यापूर्वीं इतिहासांत[1] अशी गोष्ट घडली नव्हती.

सरकारनें कांहीं सुधारणा केल्यामुळें हिंदी लोक बिचकले असे नव्हे, तर पाश्चात्य वृत्तीचें जें स्वरूप या सुधारणामधून त्यांना दिसले, त्याला ते बिचकले. 'हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत खिस्ताचें निशाण दिग्विजयानें फडकावें, म्हणूनच परमे-

---

1 W. Lee Warner : Life of Marquis Dalhousie.

श्वरानें हिंदुस्थानचे अवाढव्य साम्राज्य ब्रिटनच्या हातीं दिले आहे. सर्व हिंदी लोकांना किरिस्तांव करण्यांच्या या दिव्य कार्यांत कोणत्याही प्रकारची हयगय होऊं न देतां प्रत्येकानें या कामीं आपली सर्व शक्ती उपयोगांत आणली पाहिजे, असें मि. मॅगल्स ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांचे चेअरमन्, हाऊस ऑफ कॉमन्समध्यें म्हणालें.

१८३७ च्या भयंकर अवर्षणाचें सालीं अनाथ मुलांना खिस्ती करून त्यांची जी काळजी घेण्यांत आली त्या गोष्टीकडे सर्व वायव्य सरहद्द प्रांत, 'सरकारची एक क्लृप्ती' म्हणून पहात होता (सय्यद अहमदखां). १८९६ सालीं मिशनऱ्यानीं एक जाहीरनामा काढला, कीं आगगाड्या, आगबोटी सर्व लोकांचा संबंध वाढण्यास कारण झाल्या आहेत. सर्व वर्णांचे लोकांना एका धर्मांत आणण्याचें हें एक अप्रत्यक्ष साधनच होय.

मवाळ हिंदू लोकांना कांहींही वाटत असले, तरी कडवे मुसलमान खवळून उठले. सय्यद अहमद वारले तरी त्याचा त्यांच्या कार्यावर कांहीं परिणाम झाला नाहीं. इनायतअली आणि विलायतअली यांनीं त्यांचे थोर कार्य पुढें चालविलें. १८४७ सालीं त्यांना पंजाबांतून हद्दपार करून त्यांना पाटण्यास स्थानबद्ध करण्यांत आलें व त्यांचेकडून सद्वर्तनाबद्दल जामीन घेण्यांत आलें. असें असूनही १८५० सालीं दक्षिण बंगालमधील राजशाही जिल्ह्यांत 'तें राजद्रोहाचा प्रचार करतांना सापडलें आणि दोन्हीं वेळां त्यांना जिल्ह्याबाहेर काढण्यांत आलें.' त्यापुढील वर्षीं ते 'वायव्य सरहद्द प्रांतांत फितुरीचा प्रचार करतांना सांपडलें.' १८५२ सालीं पाटण्याचे मॅजिस्ट्रेटनें अशी तक्रार केली कीं, "या शहरामधील बंडखोर गटाची

नगर वाचनालय सातारा

संख्या वाढत आहे. ब्रिटिश सरकारच्या या इलाख्यांतील राजधानींत शहरांतील प्रमुख मंडळी राजद्रोहाचा उघडाउघड प्रचार करतात. पोलीस लोकही या भ्रमिष्ट लोकांस सामील झाले आहेत. या बंडखोरांचे एका पुढाऱ्यानें स्वतःचे घरांत ७०० लोक जमवून असें जाहीर केलें कीं, मॅजिस्ट्रेटनें जर त्यांचे बाबतींत जास्त चौकशी केली तर, त्याचा प्रतिकार शस्त्रशक्तीनें[1] करण्यांत येईल." राजद्रोहाचे प्रचारामुळें वहाबी लोक प्रत्यक्ष प्रतिकारास तयार झाले आहेत.

फैयाजाबाद येथील मौलवी अहमदशाह हे बुद्धिमान व प्रभावी संघटक वायव्य सरहद्द प्रांतांत व रोहीलखंडांत दौरे काढून व्याख्यानें देत होते. पौर्णिमेच्या चंद्रानें समुद्रामध्यें लाटा उठाव्या त्याप्रमाणें ते लोकांच्या मनामध्ये उत्साहाच्या लाटा उठवीत होते. काळ्याकुट्ट मेघाप्रमाणें मुसलमानांमध्यें शक्ति सांचून राहिली होती. त्या शक्तीचा वर्षाव करण्यासाठीं उत्सुक झाले होते.

धार्मिक गोष्टी सोडून इतर अनेक गोष्टींमुळें लोक बुचकळ्यांत पडून चिडले होते. कोर्ट कचेऱ्यामार्फत सर्व प्रकारच्या लोकांना एकाच पातळीवर आणण्याचा यत्न चालला होता. सार्वत्रिक समतेचें तत्त्व कायदेकानूंचे बाबतींत आम्ही अंमलांत आणलें असा ब्रिटिशांना अभिमान वाटत होता. हिंदी लोकांना मात्र हे कायदेकानू युरोपियनांना लागू होत नसत ही गोष्ट जाणवत असें. युरोपियनांनीं आपली जात जणूं काय ब्राह्मणांच्या पेक्षांही श्रेष्ठ श्रेणीची ठरविली होती. जातिभेदांचा सैतान सर्व राज्यपद्धतींत धुमाकूळ घालीत होता.

दिवाणी गुन्ह्यांसाठीं फटक्यांची शिक्षा रद्द करण्यांत आली.

1 W. W. Hunter : Indian Musalmans P. 22–23.

तेव्हां ( Reg. II 1834 ) त्याऐवजीं खालीलप्रमाणें कारावासाच्या शिक्षा मुक्रर करण्यांत आल्या. सेशन जज्जानें दिलेल्या ३० फटक्यांचे शिक्षेऐवजीं दोन वर्षें, मॅजिस्ट्रेटनें दिलेल्या ३० फटक्यांचे शिक्षे-ऐवजीं एक वर्ष, खालच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या ३० फटक्यांचे ऐवजीं एक महिना. यासारख्या अयोग्य गोष्टींनीं लोकांचा संताप पराकोटीस गेला.

हिंदुस्थान सुधारणांच्या भोंवऱ्यांत सांपडला होता. हा कांहीं जुन्या पायावर नवीन इमारत बांधण्याचा प्रश्न नव्हता, तर अंग-वळणीं पडलेल्या जुन्या संस्कृतीच्या अमोलिक तत्त्वांत व नवीन सुधारणांच्या गुणविशेषांत मूलभूत फरक होता. हें भेद, परंपरा आणि सुधारणा यांच्या वादापुरतेच मर्यादित नव्हते, किंवा एका स्पॅनिश म्हणीप्रमाणें सौंदर्य व नीति यामधीलही हा वाद नव्हता. मुद्दा असा होता कीं, अभिमानी हिंदी लोकांना या सुधारणांमुळें आपल्यावर जुलूम करण्यांत येऊन त्यांमध्यें आपला अपमान होत आहे असें वाटून ते गोंधळून जात असत. बंडखोरांनीं काढलेल्या जाहीरनाम्यांत असें म्हटलें होतें कीं, प्रत्येक मनुष्य सर्वांपेक्षा, स्वतःची जात व धर्म, स्वाभिमान, स्वतःचें व जातिबांधवांचे जीवित व स्वतःची मालमत्ता, या चार गोष्टी उराशीं बाळगत असतो हें सर्वांस ठाऊक आहे. पण ब्रिटिश लोक चारही गोष्टींच्या आड येत होते. लोकांचे जवळ शस्त्रास्त्रें होतीं. तीन माणसागणिक एक तरी लढाऊ हत्यार असें. मुसलमान व हिंदू यांना "गेल्या दोन वर्षांत हजारो बंदुकी आणि इतर हत्यारे विकली गेली आहेत"[1] असें मि. अलेक्झँडर डफ यांनीं

---

1 A. Duff : The Indian Rebellion P. 73.

१८९७ सालीं लिहिलें आहे. धीराच्या लोकांनीं वर लिहिलेल्या चार गोष्टींचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लोकांना शस्त्र उचलण्यास सांगण्याचा ठाम निश्चय केला.

---

## बंडाची पार्श्वभूमि : : २

१८५७ सालीं क्रान्तीस साधक अशी ग्रहांची युती जमून आली होती. प्लासीच्या लढाईस एक शतक पुरे होताच ब्रिटिश सत्तेचा अंत होणार असा भरंवसा लोकांस वाटत होता. रक्तवर्ण कमलासारख्या गूढ सूचक प्रतीकांच्या प्रसारामुळें लोकांमध्यें एकजूट व संघटित धैर्य निर्माण होत होते. " सगळेंच लालभडक होऊं लागलें आहे असें शेतकरी व शिपाई म्हणत, व असें म्हणताना त्यांच्या डोळ्यांत गूढसूचक चमक असे."[1] जाब देण्याचा दिवस जवळ जवळ येत होता. शिरें धडावेगळीं होऊन पायाशीं लोळण घेतील, रक्ताचे पूर वाहतील, जुन्या अन्यायांचा सूड घेतला जाईल, अशी सर्वांची मनोभावना दिसत होती. रणजितसिंगानें सर्व तांबडे होईल असें उद्गार निराश होऊन काढले होते. लोकांच्या दृढनिश्चयानें त्याच शब्दांस वेगळे, तीव्र व जोरदार स्वरूप प्राप्त झालें !

शिपाई बेचैन झाले. विशेषतः बंगालमधील फौजेची परिस्थिति जवळ जवळ बंडाळीची होती लोकांच्या ध्येयपूर्तीसाठीं त्यांनीं सहकार्य केल्याबरोबर स्वातंत्र्याचा मार्ग स्पष्ट व सुलभ होता. कारण फौजेच्या दृष्टीनें ब्रिटिशांची परिस्थिति नेहमीच कमजोर असे. १८५७

---

1 G. O. Trevelyan : Cawnpore.

सालीं हिंदुस्थानांत चाळीस हजार युरोपियन फौज व २,१९,००० हिंदी फौज होती. कायम फौजेंतील वर्गवारी खालीलप्रमाणें होती.

| | बंगाल | मद्रास | मुंबई | एकूण |
|---|---|---|---|---|
| ब्रि. घोडदळ (रेजिमेंटस्) | २ | १ | १ | ४ |
| ब्रि. पायदळ (बटालियन्स्) | १५ | ३ | ४ | २२ |
| युरोपियन (कंपनीज) इन्फन्ट्री बटालियन्स् | ३ | ३ | ३ | ९ |
| इन्फन्ट्री तोफखान | १२ | ७ | ५ | २४ |
| हिंदी पायदळ | ७४ | ५२ | २९ | १५५ |
| " घोडदळ (रेजिमेंटस्) | १० | ८ | ३ | १२ |

बंगालमध्यें हिंदी बटालियन्स्‌ची संख्या अकराशें व मद्रास आणि मुंबईमध्यें नऊशें होती. बटालियन्स्‌ची सर्वसाधारण संख्या एक हजार असें.

बंगाल आर्मी हा सर्व हिंदी फौजेचा मोठा भाग होता. त्याची विभागणी खालीलप्रमाणें होती.

## हिंदी कायम फौज

| | | |
|---|---|---|
| पायदळ | ७४ | बटालियन्स् |
| लाइट कॅव्हलरी : | ११ | रेजिमेंटस् |
| हॉर्स आर्टिलरी : | ४ | रेजिमेंटस् |
| फूट आर्टिलरी : | २ | बटालियन्स् |

## हिंदी तात्पुरती फौज

| | | |
|---|---|---|
| कॅव्हलरी | २३ | रेजिमेंटस् |
| शिख इन्फन्ट्री | ७ | बटालियन्स् |

युरोपियन

| | | |
|---|---|---|
| इन्फन्ट्री | १६ | बटालियन्स् |
| कॅव्हलरी | २ | रेजिमेंटस् |
| हॉर्स आर्टिलरी | २ | रेजिमेंटस् |
| फूट आर्टिलरी | ६ | बटालियन्स् |

( तोफखान्यामध्यें १२ हजारापेक्षां जास्त हिंदी गोलंदाज व ६,९०० युरोपियन गोलंदाज होते. )

हें सर्व सैन्य जवळ जवळ शंभर वेगवेगळ्या ठिकाणीं विभागलेलें असे. चाळीस हजार गोऱ्या फौजेपैकीं मोठा भाग पंजाब आणि ब्रह्मदेश या दोन टोकांस ठेवलेला असे. पंजाबांतील मुख्य ठिकाणांच्या संरक्षणासाठीं वीस हजार गोरी फौज गुंतलेली असे. गोऱ्या लोकांच्या तोफखान्यापैकीं बहुतेक सर्व भाग पंजाबांतच होता. इतरत्र, विशेषतः बंगालमध्यें, गोरे सैन्य विखुरलेले असे. उदा. औधमध्यें फक्त एकच रेजिमेंट होती. पुष्कळशीं लढाईची केन्द्रे, खजिने, दारुगोळ्याचें कारखाने हिंदी सैनिकांचेच ताब्यांत असत.

सैन्याची रचनाही उठावाचे दृष्टीनें सोयीची होती; कारण, वरच्या जातींतील लोकांचें सैन्यामध्यें वजन असे, आणि त्यांचा कल उठावाच्या भूमिकेकडेच असे. बंगाल आर्मीच्या पायदळांत २४,-८४९ ब्राह्मण २७,९९३ रजपूत १३,९२० खालच्या जातीचे लोक १२,४१६ मुसलमान व १,०७६ ख्रिश्चन होते.

शिपायांना त्यांच्या परिस्थितीची जाणीव होती, एवढेंच नव्हे, तर त्यांना त्यांच्या शक्तीचीही चांगलीच जाणीव होती. त्यांच्या गुप्त प्रचारपत्रकांत असें वाचावयास सांपडतें, कीं, “ शिपायांनीं जर

एकी केली, तर गोरे लोक म्हणजे महासागरांतील एक थेंब आहेत. बंधूंनो, ही परकीयांची कट्यार आपण आपल्या हातानें आपल्या शरिरांत खुपसून घेत आहोंत. आपण जर उठाव केला, तर यश ठेवलेलें आहे." कलकत्त्यापासून पेशावरपर्यंत मैदान खुलें होईल. शत्रूचा मागमूस राहणार नाहीं. शिपायांनीं बंडवाल्यांची बाजू घेण्याचा निश्चय करतांच क्रांतिकमलाच्या सर्व पाकळ्या उमलल्या. त्यांत पाझरणाऱ्या मधाभोंवती धैर्यवान् पुरुष घोटाळूं लागलें. इमर्सनचे भाषेंत, हिंदुस्थानची नाडी तोफेसारखी जोरांत उडूं लागली. प्लासीच्या लढाईस बावीस जूनला एक शतक पुरें झालें. या वेळीं हिंदुस्थान लोहरसाप्रमाणें उष्ण असतो. यावेळच्या उष्णतेंत ब्रिटिश शिपाई होरपळून निघत. उन्हाळ्याच्या या महिन्यांत सरकारच्या खजिन्यांत रब्बीच्या पीकाचा वसूल येऊन पडलेला असे. बंडवाल्यांना लुटण्यासाठीं तो जणू तयारच ठेवला होता. बंडवाले जेव्हां दिल्लीस जाऊन धडकले, तेव्हां, सम्राटांनीं "मजजवळ खजिन्यांत कांहीं नाहीं, तुम्हांस पगार मिळणार नाहीं" असें सांगितलें. शिपायांचें उत्तर तयारच होतें. "ब्रिटिशांचे सर्व हिंदुस्थानांतील खजिने लुटून ती संपत्ती आपल्या पायांपाशीं आणून दाखल करतो" हेंच तें उत्तर.

उठावाचा कार्यक्रम सोपा होता. हिंदुस्थानभर शिपायांनीं एकाच वेळीं उठाव करावयाचा, युरोपियन अधिकाऱ्यांना ठार करावयाचें, तुरुंगाचे दरवाजे खुलें करावयाचें, सरकारी खजिना हस्तगत करावयाचा, तारायंत्राच्या तारा तोडावयाच्या, रेल्वेचे रूळ उखडावयाचे, दारुगोळ्याचे कारखाने व गुदामें, शस्त्रागारें आणि किल्ले ताब्यांत

वाचनालय ता.

ध्यावयाचे. परकीय सत्तेस हे जबरदस्त धक्के एकाच वेळीं बसल्यामुळें तिची प्रचंड इमारत हादरली. अशा तऱ्हेनें सुरवात झाल्यानंतर या स्वातंत्र्ययुद्धास संपूर्ण पाठिंबा देण्यास लोकांना आवाहन करावयाचें.

बंडखोरांची जी कांहीं पत्रकें आमच्या हातांत आली आहेत त्यावरून ती पत्रकें लिहिणारांच्या मुत्सद्देगिरी व जनमनाची पारख या दोन्हीं गुणांची खात्री पटते. जाहीर पत्रकांचे धोरण क्रान्तीस जास्तींत जास्त लोकांचें पाठबळ मिळविण्याचें असें.

एका मोंगल राजानें २९ सप्टेंबर १८५७ रोजीं प्रसिद्ध केलेले एकच पत्रक आम्ही खाली देत आहों.

" काफर आणि विश्वासघातकी इंग्रजांच्या जुलुमामुळें सध्यां सर्व हिंदु आणि मुसलमान प्रजा पिळून निघत आहे हें सर्वांना ठाऊक आहेच. प्रमुख हिंदु व मुसलमान धर्मपालनासाठीं कित्येक दिवसांपूर्वी घरेंदारें सोडून मजकडे आले आहेत आणि त्यांनीं चालू असलेल्या धर्मयुद्धांत भाग घेऊन ब्रिटिश सत्ता मुळासकट उखडून टाकण्याचा निकराचा यत्न चालविला आहे. हा मोठा जाहीरनामा लोकांना सर्व गोष्टी समजाव्या म्हणून प्रसिद्ध केला आहे. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन त्याप्रमाणें वर्तन करणें हें प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. ज्या लोकांची या ध्येयासाठीं लढण्याची इच्छा व तयारी आहे पण ज्यांना उपजीविकेचें कांहीं साधन नाहीं त्यांच्या उपजीविकेची सोय मी करीन. हिंदी आणि मुसलमानी पुराणग्रंथ, मंत्रविद्या जाणणारे, ज्योतिषी, पंडित, रमल जाणणारे, या सर्वांचें असें ठाम मत आहे कीं, येथें इंग्रजांचा जास्त दिवस टिकाव लागणें अशक्य आहे. तेव्हां सर्वांनीं डळमळणाऱ्या ब्रिटिश सत्तेची आशा आपण होऊन सोडून देऊन

आम्हांस येऊन मिळालें पाहिजे. व बादशाही सरकारपाशीं आपली पत वाढविली पाहिजे. स्वतःच्या असंतोषाची कारणें दूर करण्यासाठीं लोकांनीं प्रथम सर्वांच्या हिताचें हें ध्येय गांठण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे ही सुवर्णसंधि जर कां एकदां हातची गेली तर मागाहून स्वतःच्या मूर्खपणाबद्दल पश्चात्ताप करीत बसावें लागेल. ' आलेली संधी कधींही वायां दवडू नये. आलेल्या संधीचा फायदा घेत असतांनाच सुदैवाचा ठेवा हातीं लागतो. चालून आलेली संधि जर वाया घालविली तर दुःखानें मनगटें चावीत बसावें लागतें.' असें एका कवीनें म्हटलें आहे.

ब्रिटिश सरकारचे कांहीं हितचिंतक असा प्रचार करीत आहेत कीं, सध्यां होत आहे तशाच तऱ्हेचा त्रास बादशाही सरकार स्थापन झाल्यावर होईल. तसा गैरसमज लोकांनीं करून घेऊ नये. अशा तऱ्हेचा त्रास क्रान्तिकालांत नेहमींच होतो. बादशाही सरकार स्थिर झाल्यावर असा त्रास होणार नाहीं. शिपायांनीं जर कोणास लुटलें तर त्यानें मजकडून दाद मागून घ्यावी. सध्याच्या अव्यवस्थेमुळें मालमत्तेचे जें नुकसान होईल तें बादशाही आमदानी स्थिर होतांच सरकारी खजिन्यांतून त्याची भरपाई केली जाईल.

## विभाग पहिला—जमिनदारांबद्दल.

ब्रिटिश सरकारनें डोईजड कर बसविलें आहेत. सध्यां कोठल्याही सर्व सामान्य नोकरास अगर मोलकरणीस एखाद्या इभ्रतदार जमिनदारावर फिर्याद करून त्याला कोर्टांत खेंचणें अगर तुरुंगांत टाकणें व येणेंप्रमाणें त्याची बेइज्जत करणें शक्य झालें आहे जमिनदारांच्या

जमिनी सरकारनें लिलांवास काढल्या आहेत या सर्व प्रकारांनीं जमिनदारांची नालस्ती व नुकसान झालें आहे जमिनदारीच्या खट-ल्यांत स्टँपचा येणारा अवाढव्य खर्च किंवा, दिवाणी कोर्टांत होणारा निष्कारण खर्च, कोर्टांतील सर्व व्यवहाराबाबतची, खोट्यानाट्याची बजबजपुरी, वर्षानुवर्षे एक खटला चालविण्याची गैरवाजवी पद्धत, या गोष्टी कोर्टांत येणाऱ्या लोकांना लुबाडून त्यांना दरिद्री करण्याचे धोरणानेंच चालू ठेवल्या आहेत. याशिवाय जमिनदारांच्या खजि-न्यांतून शाळांसाठीं, रस्ते वाढविण्यासाठीं व इस्पितळांसाठीं देणग्या घेतल्या जातात त्या वेगळ्याच. बादशाही सरकारच्या राजवटींत असें तर होणार नाहींच. उलट कर हलके होतील, जमिनदाराचा मान-मरातब आणि इभ्रत सुरक्षित राहील. जमिनदारास स्वतःच्या जमि-नदारींत संपूर्ण स्वातंत्र्य राहील. जमिनदारीबाबतचे सर्व वाद शास्त्रें आणि शरियतप्रमाणें ताबडतोब बिनखर्चानें मिटाविण्यांत येतील. जे जमिनदार चालू लढ्यास द्रव्य आणि सैनिक यांची मदत करतील त्यांना एक चतुर्थांश सारा माफ करण्यांत येईल. ज्या जमिनदारांची जमीन ब्रिटिश सरकारनें अन्यायानें काढून घेतली असेल त्यांनीं या युद्धांत जर स्वतः भाग घेतला तर त्यांची जमिन त्यांना परत देण्यांत येईल व एक चतुर्थांश सारा माफ करण्यांत येईल.

**विभाग दुसरा—व्यापाऱ्यांबद्दल**—जुलमी आणि काफर ब्रिटिश सरकारनें कापड, नीळ आणि जलमार्गानें होणारी वाहतुक या सर्व व्यापारांचे मक्ते घेतले आहेत. त्यामुळें सर्वसाधारण लोकांस अगदीं किरकोळ गोष्टींचाच व्यापार करणें भाग पडतें आणि त्यामधून सुद्धां जकात, फिर्यादीमधील स्टॅम्प फी वगैरे मार्गांनीं सरकार फायदा

उकळीतच असतें. लोकांचे हातांत व्यापार नांवापुरताच राहतो. पोस्टाचा खर्च, जकात नाकीं, शाळांसाठीं वर्गणी, या निरनिराळ्या मार्गांनीं व्यापाऱ्यांच्या फायद्यावर गदा येते ती निराळीच. याशिवाय कोठल्याहि भिकार माणसानें तक्रार करतांच त्याची तुरुंगांत रवानगी वगैरे प्रकारांनीं बदनामी करण्यांत येते. बादशाही सरकार स्थापन होतांच या सर्व फसवणुकींना आळा घालण्यांत येईल आणि व्यापाऱ्यांना कोणत्याही वस्तूचा खुष्कीनें वा जलमार्गानें व्यापार करता येईल. व्यापाऱ्यांना मालवाहतुकीसाठीं आगगाड्यांचे डबे फुकट पुरविले जातील. ज्या व्यापाऱ्यांचे जवळ भांडवल नसेल त्यांना सरकारी खजिन्यांतून भांडवलाची मदत केली जाईल. तेव्हां स्वतःच्या परिस्थितीचा व फायद्याचा सारासार विचार करून गुप्त अगर उघडपणें बादशाही सरकारला द्रव्य अथवा मनुष्यबळाची मदत करणें हें प्रत्येक व्यापाऱ्याचें कर्तव्य आहे.

**विभाग तिसरा—सरकारी नोकरांबद्दल**—ब्रिटिश राजवटींत जे लोक सैन्यांत अगर सरकारी नोकर आहेत, त्यांना कसल्याही तऱ्हेचा मान नाहीं, त्यांचे कोठेंहि वजन नाहीं ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. या दोन्हीं खात्यांतील सर्व मोठ्या जागा फक्त ब्रिटिशांनाच दिल्या जातात. अर्धेअधिक आयुष्य सरकारी नोकरींत घालविल्यानंतर हिंदी लोकांना सुभेदाराची ६०–७० रु. पगाराची जागा मिळते. व सिव्हील सर्व्हिसमध्यें जास्तींत जास्त सदर आला ही महिना ९०० रु. पगाराची जागा मिळते, परंतु कोठल्याही तऱ्हेचें वजन, जहागीर वा इनाम प्राप्त होत नाहीं. कर्नल, जनरल, कमांडर इन चीफच्या जोडीच्या, पनसादी, पंचहजारी, सिपाह–सालारी

या सध्या ब्रिटिशांनाच मिळणाऱ्या जागा हिंदी लोकांस दिल्या जातील. तसेंच कलेक्टर, मॅजिस्ट्रेट, सदर जज्ज, जज्ज सेक्रेटरी, गव्हर्नर, वगैरेंच्या तोडीचे हुद्दे फक्त ब्रिटिशांनाच मिळूं शकतात. त्यांच्या तोडीचे वझीर, काझी, साफीर, सुब्बा, सुबाह, निझाम व दिवाण हे लाखो रुपये पगाराचे हुद्दे व त्याबरोबर जहागिऱ्या, खिलात, इनाम इत्यादि सर्व गोष्टी हिंदी लोकांस दिल्या जातील.

**विभाग चवथा—कारागिराबद्दल**—युरोपियनांनीं हिंदुस्थानांत ब्रिटिश माल विकण्यास सुरुवात केल्यापासून पिंजारी, विणकर, सुतार, लोहार, चांभार, इत्यादि लोकांचा धंदा बुडाला आहे व ते बेकार व दरिद्री झाले आहेत. बादशाही राजवटींत राजे महाराजे आणि श्रीमंत लोकांचे काम फक्त हिंदी कारागिरानांच दिले जाईल. त्यामुळें त्यांना खात्रीनें सुस्थिति प्राप्त होईल. यासाठीं ब्रिटिश लोकांचे काम-काज झुगारून देऊन लढणाऱ्या 'मुजाहिदिनांना' मदत करून इह-लोकचे व परलोक सुख साधा.

इति-६९

**विभाग पांचवा—पंडित आणि फकीरांबद्दल**—पंडित आणि फकीर हे हिंदु व मुसलमान धर्माचे संरक्षक आहेत व युरोपियन लोक दोन्ही धर्मांचे शत्रू आहेत. सध्यां ब्रिटिशांचे विरुद्ध धर्मसंरक्षणासाठीं जें युद्ध चालू आहे त्यांत भाग घेण्यासाठीं पंडित आणि फकीर मजकडे खास येतील. तसें जर ते आले नाहींत तर शरियत आणि शास्त्र यांच्या नियमाप्रमाणें त्यांचें वर्तन अधार्मिक ठरेल. पण जर ते युद्धांत लढावयास दाखल झाले तर बादशाही सरकारची सत्ता स्थिर होतांच होतांच त्यांना बिनकराच्या जमिनी बहाल करण्यांत येतील.

शेवटीं सर्वांस हें जाहीर व्हावें कीं वर उल्लेखिलेल्यांपैकीं कोणीही

क्र. ८८५७७
इति-६९
दि. १-५-५७

इस्तेहार प्रसिद्ध झाल्यानंतर जर ब्रिटिश सत्तेस चिकटून राहिला, तर त्याची सर्व मालमत्ता जप्त केली जाईल व घरदार लुटले जाईल तो व कुटुंब यांना तुरुंगांत डांबलें जाईल व शेवटीं त्यांना ठार मारण्यांत येईल."

एवढा मोठा उतारा देण्यामध्यें कांहीं चुकतें आहे असें वाटण्याचें कारण नाहीं. त्याची जरूरी स्पष्टच आहे.

जाहीरनाम्यामध्यें वेगवेगळ्या लोकांच्या तक्रारी व असंतोषाची कारणें यांची नोंद केलेली आहे आणि बंडवाल्यांच्या मनामध्यें ज्या पद्धतीची राजवट क्रांतीनंतर स्थापन करण्याची इच्छा होती त्याची रूपरेषाही दिली होती. जाहीरनाम्यावरून क्रांतिकारकांच्या शक्तीची कल्पना येते तसेंच त्या शक्तींच्या मर्यादा काय आहेत याचाही कयास बांधता येतो.

---

## बंडाचा विस्तार : : ३

उठावाची सर्व मदार सैन्यावर होती. जेथें जेथें सैन्य राजनिष्ठ राहिले तेथें तेथें जमिनदार इनामदारांनीं केलेला किंवा जनतेचा उठाव फारच कमजोर राहिला. मद्रासचे सर्व सैन्य आणि हिंदुस्थानी तुकड्या सोडून, मुंबईचें सर्व सैन्य ब्रिटिशांशी राजनिष्ठ राहिले. दक्षिण हिंदुस्थानांत अधून मधून जे उठाव झाले त्यामुळें जरी सरकारला चिंता वाटत असली तरी त्यामुळें सरकारला खराखुरा त्रास फार थोडा झाला. उठावाच्या हांकेबरोबर बंगाली सैन्य धैर्यानें व जोरानें सरसावले बंडाच्या आगीनें होरपळून एकामागून एक ठिकाण त्यांनीं

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आपल्या ताब्यांत घेतले. फक्त ११ इन्फन्ट्री बटालियन्स्च राजनिष्ठ राहिल्या. दुय्यम आणि राखीव सैन्याची विभागणी या बाबतींत अशीच होती. २२३११ ट्रुप्स्पैकीं पुढें दिलेली युनिट्स बंड करून उठली. ग्वाल्हेर ८,४०१ कोटाह १,१४८ भोपाळ ८२९, संयुक्त माळवा १,६१७ जोधपूर १,२४६ मध्यहिंदुस्थानांतील बंगाल आर्मीची सर्व पथकें (दोन भिल्ल पथकें सोडून), हैद्राबाद ८,०९४ म्हैसूर ४,००० बडोदा ३,७४६ येथें असलेल्या सैन्यानें दक्षिण हिंदुस्थानांतील सैन्याचें अनुकरण केलें. दिल्ली, मिरत, रोहिलखंड, आग्रा, बनारस, अलाहाबाद या वायव्य इलाख्यांतील भागांत, पटणा छोटा नागपूर या दक्षिण बंगालचे भागांत आणि निमूच आणि अजमीर या मध्यहिंदुस्थानांतील जिल्ह्यांमध्यें मार्शल लॉ पुकारण्यांत आला होता. यावरून बंड झालेल्या भागाची साधारण कल्पना येईल. औध आणि पंजाबमध्यें "अधिकाऱ्यांचें वर्तन मार्शल लॉ पुकारल्याप्रमाणेंच होतें." १८५७च्या जूनमध्यें बंडखोरांची संख्या औधमध्यें २९,००० दिल्लींत व दिल्लीच्या आसपास ३०,००० मध्यहिंदुस्थानांत ५०,००० होती. दिल्ली, औध, रोहिलखंड आणि बुंदेलखंड यांनीं परकीय सत्तेचें जूं झुगारून दिलें. वायव्य सरहद्द प्रांत, मध्यप्रांत, मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें आणि पश्चिम बिहार येथें गंभीर स्वरुपाची रणधुमाळी सुरूं झाली. बंड सुरूं झाल्याचें कळतांच सर रिचर्ड टेंपल हे इटलीतून निघून घाईनें हिंदुस्थानांत आले. पण हिंदुस्थानांत येतांच त्यांना असें कळून चुकलें कीं, 'पंजाबांत जाण्याचे

एकूण एक रस्ते बंद झाले आहेत.'[१] जनरल हॅवलॉक हे पर्शियाहून परत येत असतांना दिल्लीस जाण्याचें खुष्कीचे सर्व मार्ग बंद असल्याचें त्यांना आढळून आलें. त्यांना जलमार्गानें कलकत्त्यास जाणें भाग पडलें.

देशांतील कांहीं भागांत बंडास सर्व जनतेच्या उठावाचें स्वरूप प्राप्त झालें. औध, रोहिलखंड, बुंदेलखंड, सागर, आणि नर्मदेचें खोरें या साम्राज्याच्या चार मोठ्या इलाख्यांत सर्वसाधारण जनतेचा मोठा भाग ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठला. पश्चिम बिहार, पाटणा विभागाचे बरेंच जिल्हे, आग्रा विभाग, मिरतचा कांहीं भाग यांमधील उठाव अगदीं एका वेळीं झाला.[२]

रोहिलखंडांतील लोक एका दिवसांत बंड करून उठले. "बरेली, शाहजहानपूर, मुरादाबाद, बुधौन आणि इतर जिल्ह्याचें ठिकाणीं सैन्य, पोलीस, आणि लोक, यांनीं जाहीरनामे काढून ब्रिटिश सत्ता कांहीं तासांत उधळून दिली. हिंदी रक्ताचा एक बिंदूही सांडला नाहीं. 'रोहिलखंड परतंत्र आहे.' असें म्हणण्याऐवजीं 'रोहिलखंड स्वतंत्र आहे, असें ते म्हणाले आणि रोहिलखंड स्वतंत्र झाला."[3] जें रोहिलखंडास साध्य करतां आलें तें साध्य करण्याचा यत्न सर्व हिंदुस्थानास खास करतां येईल असा युक्तिवाद बडवाले करूं लागले.

---

1 R. Temple : Men and Events of my Time in India P. 127-

2 G. B. Malleson : History of the Indian Mutiny P. iii 487.

3V. D. Savarkar : War of Independence P. i 159

यमुनेच्या पश्चिमेस कांहीं राजांनीं आपल्या प्रजेस ब्रिटिश सत्ते-पुढें नमवून ठेवलें होते. पण दुआबमधील खेडीं, व गंगेचा पूर्व भाग, येथील लोकांनीं परकीय सत्तेचें जू झुगारून दिलें. "गंगेच्या पलिकडच्या जिल्ह्यांतच नव्हे, तर दुआबांतील खेड्याखेड्या-मधील जनता बंड करून उठली होती. थोडयाच अवकाशांत आमच्याविरुद्ध असलेल्या संघटनेंत सामील नव्हता असा एकही मनुष्य दोन्ही धर्मांत राहिला नाहीं."[१] प्रत्येक वेळीं रेजिमेंटमध्यें बंड झाले, कीं ज्या जिल्ह्यांतील लोकांची ती रेजिमेंट असेल तो जिल्हा हातचा जाई. "औधमधून ब्रिटिश शासनसंस्था दहा दिवसांत स्वप्न सृष्टीसारखी विरून गेली. तिचा मागमूसही राहिला नाहीं. सैन्यानें बंड केलें, लोकांनीं राजसत्ता झुगारून दिली. पण कसलीही जुलूम जबरदस्ती झाली नाहीं."[२] स्वातंत्र्याचें वारें औधवरून वाहू लागतांच तेथून शूर सैनिक निर्माण झालें. थोडयांच दिवसांत औधमध्यें जिकडे तिकडे सशस्त्र लोक दिसू लागले. शिपायांव्यतिरिक्त अशा सशस्त्र लोकांची संख्या एक लक्ष होती. प्रांतांत विखुरलेल्या पंधराशें किल्ल्यांचें भरीस कित्येक खेडेगांवांतून असा लढाऊ बंदोबस्त कर-ण्यांत येई, कीं, शत्रूला निकराच्या प्रतिकारास तोंड द्यावें लागे. "खेडयांतील लोहार, सुतार सैनिकांपेक्षां चांगले लढतात" असें एच्. सी. टकर यांनीं लिहिलें आहे. "मध्यहिंदुस्थान हातांतून गेला आहे, तो पुन्हां जिंकावा लागेल असेंच मी समजतों' असें लॉर्ड कॅनिंग यांनीं लिहिलें आहे.

---

1 J, K. Kaye : Indian Mutiny P. ii;195,

1 G. W. Forest : A History of Indian Mutiny pp i 217.

कलकत्त्याच्या सरकारचा दिल्लीचे कमांडर अगर आग्र्याचे गव्हर्नर यांचेशीं सरळ पत्रव्यवहार होऊ शकत नसे. जी कांहीं तुटपुंजी माहिती मिळे, ती लाहोर अगर मुंबई मार्गानें त्यांना पोंचत असे. यावरून ब्रिटिश सत्तेची पाळेंमुळें कांहीं प्रांतांतून कशी खणून निघाली होती याची कल्पना येईल.

बंडखोरांनीं अलौकिक धैर्यानें दिल्लीचा कबजा घेतला. केलेली ही कामगिरी खरोखर दिव्य होय. त्यामुळें बंडास राष्ट्रीय व लोकमान्यता प्राप्त झाली. " शिपायांना क्षणभरांत नेता, निशाण आणि ध्येय गवसलें आणि बंडाचें रूपांतर क्रान्ति- युद्धांत झालें."[1] पण नेता, निशाण वा दिल्लीच्या अजरामर शहराचा कबजा यांच्या मानासिक परिणामापेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे या कबजामुळें बंडखोरांची शस्त्रास्त्रांची निकडीची गरज भागली कारण त्यांना दिल्लीच्या दारूगोळ्याचें कोठारांत, ९००,००० बंदुकीच्या गोळ्या, हल्ल्यासाठीं तयार ठेवलेल्या दोन सुसज्ज आगगाड्या व बऱ्याच फील्डगन्स, आठ ते दहा हजार मस्केट्स् व १०,००० बंदुकीच्या दारूची पिपें मिळालीं.

लोकांचा प्रतिकार जोरकस आणि दमदार होता. जॉन लॉरेन्स यांनीं ज्या दिल्लीमधील बंडाबद्दल कुचेष्टेचे उद्गार काढले होते त्याच दिल्लीनें इतिहासांत अपूर्व असें युद्ध केलें. मराठ्यांचा, किंवा उत्तरेकडील हल्ल्यांचा असा प्रतिकार दिल्लीनें पूर्वी कधींच केला नव्हता. अनेक अयशस्वी प्रयत्नानंतर ब्रिटिशांनीं शहरावर जेव्हां निकराचा

1 Justice MaCarthy : History of Our own Times P. iii.

हल्ला चढविला तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं, लढविल्या-खेरीज एकही रस्ता अगर पाऊलभर जागासुद्धां बंडखोर हातची जाऊ देत नसत.[1] शहर पुन्हां ताब्यांत आल्यानंतर या भोंवऱ्याचें चक्र जरी नाहींसें झालें होतें, तरी भोंवतालचे खेड्यांमधून लढाई चालूच होती. विजयी ब्रिटिश लोकांना हीं खेडेगांवें आग्यामोहोळा-सारखी वाटत असत. "कित्येक खेडेगांवाभोंवती चर खणून वा मातीचे तट बांधून संरक्षणाची व्यवस्था केलेली असे. खेड्यांमधून हजारों सशस्त्र लोक असत."

विल्यम हॉवर्ड रसेल या 'टाइम्स'च्या बातमीदारास बनारसपर्यं-तच्या प्रवासांत असें दिसून आलें कीं "गोऱ्या लोकांचे गाडीकडे[2] कोणीहि आपुलकीनें वा मित्रत्वानें पहात नव्हते. खेडेगांवांतील लोक कपाळावर द्वेषाचें रक्तवर्ण चिन्ह लावीत. बिहारमध्यें ब्रिटिशांना "नेहमीं खोटीं माहिती सांगून व्यवस्थितपणें फसवीत असत." औंध मध्यें बंडखोरांना शिधासामुग्री जवळ बाळगावी लागत नसे. कारण लोक त्यांना जेऊं घालीत. त्यांना त्यांचें साहित्यावर पहारा ठेवावा लागत नसे. कारण लोक त्यांना कधींच उपद्रव देत नसत. त्यांच्या स्वतःच्या आणि ब्रिटिशांच्या परिस्थितीची त्यांना पूर्ण कल्पना असे कारण लोक त्यांना तासातासानें बातम्या पुरवीत असत. त्यांच्यापासून कोणतीही योजना लपवून ठेवतां येत नसे कारण त्यांचे हितचिंतक, सैन्याचे खानावळींत व प्रत्येक तंबूंत हजर असत.

---

1 George Cambell : Memoirs of My Indian Career P. ii 358.

2 W. H. Russell : My Diary in India P. ii 572.

त्यांच्याविरुद्ध अचानकपणें काहींही करणें जादुटोण्याखेरीज अशक्य होतें. तोंडोतोंडीं जाणारी बातमी आमच्या घोडदळाला मागे टाकी."[1]

या इलाख्यांतून शिपाईच काय पण पोलिस आणि जवळ जवळ सर्व सरकारी नोकर बंडांत सामील झाले होते. श्रीमंत लोकांची ब्रिटिशाबद्दलची राजनिष्ठासुद्धा डळमळू लागली होती. पंजाबमध्यें यापूर्वीं ब्रिटिश सत्तेच्या स्थैर्याबद्दल साशंकता कधींच नव्हती. तेथेंही सहा टक्क्यानीं १,०००,००० पौंडाचें कर्ज ब्रिटिशांना जमविता आलें नाहीं. लाहोर, अमृतसर सारख्या धनाढ्य शहरांतल्या कोट्याधीशानीं शंभर शंभर पौंड कर्जाऊ देऊं केले.[2] इतरांनींही याच प्रमाणांत कर्ज देऊं केलें. अशा तऱ्हेनें या उठावावर 'राष्ट्रीय उठावा'चा शिक्कामोर्तब झाला.

१८९७ च्या बंडाच्या कालांत हिंदुस्थानच्या सरकारी अर्थखात्यांच्या हिशेबांत खजिने लुटले गेल्यामुळें, सारा वसूल न झाल्या मुळें, सार्वजनिक मालमत्तेच्या नासधुशीमुळें १९,०००,००० पौंडाची तूट आली. बंडाचा बीमोड करण्यासाठीं लोकांकडून घेतलेल्या कर्जांत ४६,०००,००० पौंड कर्जाची भर पडली.

बंडामुळें सरकारबद्दल गैरविश्वास निर्माण झाला. शंभराच्या सरकारी कर्जरोख्यांची किंमत १२९ पासून ७९ पर्यंत उतरली. 'बँक-ऑफ बंगाल'नें 'सरकारी कागदावर' पैसे देणें अशक्य आहे असे जाहीर करण्याइतकी १८५७ मध्यें आर्थिक परिस्थिति बिकट झाली होती.

---

1 Aitchison : Lord Lawerence P. 81.

2 I. Trotter : India Under Queen Victoria P. ii 89.

अंतर्गत व्यापार अगदीं मंदावला. इंग्लंडमधून होणारी आयात तर जवळजवळ थांबलीच. व्यापारी आणि पेढीवाले यांनीं जवळजवळ सर्व ठिकाणीं आपले सर्व व्यवहार थांबविले. तांदुळासारख्या आवश्यक वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढल्या. लढाईचे विराटस्वरूप ध्यानांत घेतले तर यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

बंडाच्या पहिल्या वर्षांत ३०,००० बंडवाले शिपाई रणांगणांत कामीं आले. ब्रिटिशांशीं लढतांना १०,००० सशस्त्र नागरिक प्राणास मुकले. गोळ्या घालून ठार मारलेले, तोफेंत घालून उडविलेले, मिलिटरी व मुलकी कोर्टांच्या हुकुमानुसार फाशीं दिलेले असे अगणित लोक प्राणास मुकले. बंड शांत झाल्यानंतर लोकांनीं असा अंदाज बांधला कीं, दोन वर्षांत जखमा, हालअपेष्टा आणि कोर्टांनीं दिलेल्या शिक्षा यामुळेंच १,००,००० शिपायांना मृत्युमुखीं पडावें लागले असेल. याच काळांत जे इतर बंडवाले मारले गेले त्यांची संख्या यापेक्षांही जास्त असण्याचा संभव आहे. हा विजय जेत्यांनाही भयंकर हानीखेरीज लाभला नाहीं.[1]

मातृभूमिस स्वातंत्र्य मिळावें म्हणून २,०००,०० हिंदी लोकांनीं धारातीर्थीं प्राण ठेवले. गेल्या शंभर वर्षांमध्यें जेवढ्या निकराच्या लढाया झाल्या त्यांत कामी आलेल्या लोकांच्या संख्येच्या चौपट लोक ज्या युद्धांत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य पुरें हरपले त्यांत कामीं आलें असें म्हटलें म्हणजे या आंकड्याच्या (२,००,०००) भयंकर स्वरूपाची कल्पना येईल. (पुढील कोष्टक पहा).

---

1 I. Trotter : India Under Queen Victoria P. ii 89.

| वर्ष | लढाईचें ठिकाण | मनुष्यहानीचा आंकडा | |
|---|---|---|---|
| | | ब्रिटिश | हिंदीऽ |
| १७५७ | प्लासी | ७२* | १,०००* |
| १७६४ | बक्सार | ८४७ | २,००० |
| १८०३ | असाय | २,०७० | १,२०० |
| १८०३ | लसवारी | ८३८ | १,५०० |
| १८१८ | खडकी | ८६ | ५०० |
| १८१८ | महिद्पूर | ७९७ | ३,००० |
| १८४३ | मियानी | २७५ | ६,०००* |
| १८४३ | महाराजपूर | ७७८ | ३,००० |
| १८४५ | फेरोजपूर | २,४१५ | ७,००० |
| १८४५ | सोब्राओन | ३,३८३ | ७,००० |
| १८४८ | चिलियनवाला | २,४४६ | ५,००० |
| १८४८ | गुजराथ | २,४०० | ५,००० |

मनुष्यबल आणि द्रव्य यांच्या हानीच्या या आंकड्यांनीं बंडाच्या विराट स्वरूपाची कल्पना येईल. युरोपमधील समकालीन घडामोडींशीं बंडाची तुलना केल्यास त्याच्या स्वरूपाची व शक्तिची अधिक स्पष्ट कल्पना येईल. बंडखोरांचे ताब्यांत १,००,००० चौरस मैलाचा प्रदेश आणि ३८,०००,००० लोकसंख्या होती. म्हणजे जवळ-जवळ इटली या देशाची बरोबरी झाली. ब्रिटिशांच्या दोन्ही युद्धां-तील मृत्युबाबतची आंकडेवारी पाहतां क्रिमियाचे युद्धांत शूर रशि-यन लोक जेवढ्या निकरानें लढले तेवढ्याच निकरानें बंडवालेही लढले हें ध्यानांत येईल. लखनौ येथें हिंदी शिपायांनीं ३६,०००

* यांत जखमी लोकांचाही समावेश होतो.

ऽ हिंदी लोकांचा आंकडा अंदाजी आहे.

ब्रिटिश ट्रुप्सूना तोंड दिलें. इतिहासप्रसिद्ध सॅबेस्टा पूलच्या वेळ्यांत २६,००० ब्रिटिश ट्रुप्स होतीं.

अर्थात १८५७ हें कांहीं नुसते शिपायांचें बंड नव्हतें. आपणास अभिमान वाटेल व आपल्या परंपरेस साजेल असें तें घनघोर स्वातंत्र्य-युद्ध होतें.

---

## बंडाचें स्वरूप : : ४

हें एक शिपायांचें मामुली बंड होतें असें म्हणण्याचा इंग्लिश लेखकांनीं आग्रह धरला आहे. सर जॉन सीली यांनीं तर, " या बंडास जनतेचा पाठिंबा नव्हता, हिंदी नेत्यांचे नेतृत्त्व नव्हतें व देश-प्रेमाचा लवलेशही नसलेली ही एक घटना होती " असा आरोप बंडाचे बाबतींत केला आहे. विराट ऐतिहासिक घटनेस साधें नांव कधींच शोभून दिसत नाहीं. वेगळ्याच नव्हें तर प्रसंगीं परस्पर विरुद्ध वाटणाऱ्या लहानमोठ्या घडामोडी मिळून अशी घटना जमून येत असते. वेगवेगळ्या आकांक्षांमुळें वेगवेगळ्या प्रवृत्ती जागृत होऊन जरी लोक लढण्यास तयार होत असले तरी, युद्धांत भाग घेणाऱ्या सर्वांना शिस्तीनें बांधून त्यांना योग्य वळण लावील असा सर्वसाधारण आकांक्षेचा कणखर धागा शोधून काढणें कठीण नाहीं. बंडामध्यें असे वेगवेगळे सूर तरी काय होते, आणि त्या सर्वांना मुरड घालील अशी कोणची शक्ति होती ?

शिपाई हेच तर बंडाचे खरेखुरे आधार होते. मातृभूमीच्य

शृंखला तोडण्यासाठीं सुरुवातीच्या सर्व भयंकर संकटांचा भार त्यांचे-वरच पडला. सरकारविरुद्ध निर्माण झालेल्या असंतोषाचे रूपांतर, निरर्थक व विस्कळित प्रयत्नांत न होऊं देण्याचें सर्व श्रेय त्यानांच आहे. शिपाई हाच प्रतिकाराचा पाया. शिपाई हेच बंडाचें हत्यार व ढाल. स्वतःचें योग्य महत्त्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्यांनीं 'बंडा' येथें—

'खल्क–इ–खुदा
मुल्क–इ–पातशाह
हुक्म–इ–सीपाह'

अशी दवंडी पिटली त्यावरून ध्यानांत येईल, शिपायांखेरीज लाखो लोकांनीं बंडाचें कार्यांत भाग घेतला. बंडांत कामीं आलेल्या लोकांच्या यादींत शिपायाच्या एका नांवाचे जोडीला त्यांचे एक नांव आहेच. ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं लोकांनीं बंडांत जो भाग घेतला तो स्वतःची कांहींही अडचण दूर करण्यासाठीं नव्हे तर त्यांच्या शिस्तशील प्रचंड शक्तिचा उपयोग स्वातंत्र्य मिळ-विण्यासाठीं करण्याचा त्यांचा जो दृढ निश्चय होता त्यामुळें.

अनेक गोष्टींनीं असें सिद्ध झालें आहे कीं झालें तें नुसतें बंड नसून तो राष्ट्रीय उठाव होता.

सर्वत्र चाललेला उठाव एकाच सर्वश्रेष्ठ सत्तेखालीं व एकाच निशाणाखालीं चालू होता. नानासाहेब, औधच्या बेगमसाहेबा, झांशीच्या राणीसाहेब, बरेलीचे खां बहादूर खां, यांनीं बंडाचें नेतृत्व स्वीकारलें, मोंगल सम्राटाचे प्रतिनिधी म्हणून त्यांना पूर्वीचे स्थान प्राप्त झालें. मोंगल सम्राटाची ही सत्ता नांवापुरतीच सार्वभौम मानली

जात नव्हती. त्याचेकडे अहवाल व खंडण्या बिनतक्रार पाठविल्या जात असत. सैन्याची प्रत्येक तुकडी ' चलो दिल्ली ' ' चलो दिल्ली ' या रणगर्जनेबरोबर बंड करून उठली. त्यांच्या भावनात्मक आणि राजकीय निष्ठेचें केंद्रस्थान मोंगल बादशहा हेंच होते.

ज्या वेगानें बंड वाढत होते व ज्या प्रांतांत ते पसरत गेले त्यावरून त्या भागांत तरी बंडास जनमताचा पाठिंबा होता ही गोष्ट अगदीं स्पष्ट होती. मिरत आणि अलिगड या ठिकाणीं शिपायांना जनतेनेंच बंडास प्रवृत्त केले. जे लोक उघडपणें ब्रिटिशांचे बाजूस जाऊन मिळालें त्यांना लोकांचे शिव्याशाप खावे लागले. कांहीं वेळां पाटण्याप्रमाणें लोकांनीं त्यांचेवर बहिष्कारही घातला. ज्यांना ब्रिटिशांशीं उघडपणें प्रतिकार करतां आला नाहीं त्यांनीं ब्रिटिशांशीं असहकार सुरू केला. जनरल हॅवलॉक यांना सैन्य नदीपार करण्या-साठीं नावाडी मिळाले नाहींत. कानपूरला ज्या मजुरांना बळजबरीनें कामास लावले होते ते रातोरात कॅंपमधून पळून गेले. अॅन्सन यांची फौज दिल्लीकडे जेव्हां पायीं गेली, तेव्हां ' पेढीवाले, व्यापारी, ठेकेदार, मजूर, सर्व वर्गाचे हिंदी लोक त्यांच्याशीं संबंध न येऊं देण्याचा प्रयत्न करीत आहेत ' असें त्यांना आढळून आले. ब्रिटिश सत्तेचे एखाद्या ठिकाणाहून उच्चाटन होताच लोक ताबडतोब सशस्त्र होत.

बंडाच्या काळांत लोक जातिवाद विसरून एकरूप झाले. दोन्ही जातींत जी सहकार्याची भावना निर्माण झाली होती तीच या बंडाचे राष्ट्रीय स्वरूप सिद्ध करील धर्माधर्मांत फूट पाडून त्यांचेवर राज्य करण्याचें जुनें धोरण अंमलांत आणून ही आणीबाणीची वेळ पार

पडेल अशी सरकारला आशा होती. सर हेन्री लॉरेन्स यांनीं लार्ड कॅनिंग यांना असें लिहिलें आहे कीं (१ मे १८५७) 'या दोन्ही लोकांच्या धर्मभावनेमध्यें कोठें फरक पडतो याकडे मी चांगलें लक्ष ठेवीन.' रसेल कॉलव्हिन या आग्र्याच्या ले. गव्हर्नरास जेव्हां उठावाची बातमी मिळाली तेव्हां त्यांनीं ग्वाल्हेरचे मराठे, आणि भरतपूरचे जाठ यांची भरती, त्यांच्या परंपरागत शत्रूविरुद्ध लढण्यासाठीं करण्याची तोड त्यांना सुचविली. पण धार्मिक द्वेष मात्र वाढू शकला नाहीं. अचिसननें दुःखानें असें कबूल केलें आहे कीं, "या वेळीं आम्हाला हिंदु विरुद्ध मुसलमानांना लढविता आले नाहींत."[१] ही एकजूट दोन्ही धर्मांतील लोकांना हवी होती. एकमेकांची अडचण समजावून घेऊन एकमेकास मदत करण्यास, शांतपणानें वागण्यास व एकमेकांचा मान राखण्यास सैन्यांतील दोन्ही धर्मांचे पुढारी उत्सुक होते. त्यामुळेंच सरकारचा नेहमींचा डाव फसला. बरेलीचे नबाब खां बहादुर खां यांनीं काढलेल्या एका जाहीरनाम्यांत असें म्हटलें होते कीं ब्रिटिशांना हिंदुस्थानबाहेर काढण्यास जर हिंदूंनीं मदत केली तर मुसलमान लोक गायी मारण्याचें बंद करतील व गायींचे मांस डुकराच्या मांसाप्रमाणेंच वर्ज्य करतील, असें सर्व मुसलमान अधिकाऱ्यांनीं ठरविले आहे. सम्राटांनीं तर हिंदूंनीं त्यांना येऊन मिळण्याची वाटही न पाहता त्यांच्या भावनेस मान देऊन गोहत्या कायद्यानें ताबडतोब बंद केली. औधच्या शिपायांनीं दिल्लीहून हर्षभरानें आपल्या बॅरकपूरच्या दोस्तांस लिहिलें आहे कीं, "यापुढें देशांत गोहत्या करण्यास सम्राटांनीं बंदी केली आहे."

1 Aitchison op. cit. 77.

या गोहत्त्या बंदीपेक्षाहि सम्राटांनीं स्वत: तख्त सोडून देण्याची तयारी दाखविली ही महत्त्वाची गोष्ट होती. त्यांनीं स्वहस्तानें जयपूर, जोधपूर, बिकानेर, अल्वार येथील राजांस पत्रें लिहिली कीं, "माझी अशी तीव्र इच्छा आहे कीं कांहींही करून, कांहींही पणास लावून, फिरंग्यांना हिंदुस्थानाबाहेर घालविले पाहिजे. संपूर्ण हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा हीच माझी इच्छा आहे. पण सर्व राष्ट्राची निष्ठा ज्यामध्यें केंद्रीभूत झाली आहे, जो या लढ्याची सर्व जबाबदारी शिरावर घेऊ शकेल, अशा नेत्यानें पुढे येऊन या युद्धांतील सर्व शक्ती संघटित करून त्याना कार्यक्षम केल्याशिवाय हें युद्ध यशस्वी होणार नाहीं. इंग्रजांना हिंदुस्थानांतून हांकून लावल्यावर हिंदुस्थानच्या तख्तावर बसण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्ही सर्व हिंदू राजे, शत्रूस हांकून लावण्यासाठीं, जर शस्त्र उचलणार असाल, तर माझे सर्व अधिकार व अधिकारसूत्रें राज्यशकट चालविण्यासाठीं तुम्हीं निवडून दिलेल्या प्रतिनिधी मंडळाचे हातांत देण्यास मी तयार आहे."[1]

मुसलमानांशीं सलोख्याचे संबंध ठेवण्यासाठीं हिंदूनीं तेवढीच तयारी दाखविली नानासाहेबांनीं काढलेल्या पहिल्या जाहीरनाम्यांत आपण मोंगल बादशहाशीं राजनिष्ठ राहूं असें जाहीर केलें. त्यांनीं फडकाविलेलें निशाण अर्धचंद्राचेंच होते. ( त्याचबरोबर त्यांनीं वंशपरंपरागत भगवा झेंडाही फडकविला होता. ) त्यांच्या पत्रव्यवहारांत, नेपाळचे महाराज जंगबहादूर यांना लिहिलेल्या पत्रांतसुद्धां ते हिजरी सनाचा उपयोग करीत.

हिंदु आणि मुसलमान एका कार्यास लागले, एकाच ध्येयासाठीं

---

1 C. T. Metcalfe : Two Native Narratives. P. 226.

त्यांचें रक्त वाहिलें, सर्व भेदाचा विसर पडला. यावरून बंडाची मूलभूत भूमिका पूर्णपणें राष्ट्रीय होती ही गोष्ट सिद्ध होतें. युद्धाचें पारडें बंडवाल्यांविरुद्ध फिरताच शिखांनीं विश्वासघात केला. सुरवातीस शिख लोकांची भरती होऊं लागली होती खरी पण त्यांची संख्या फार नव्हती. दिल्ली पुनः ब्रिटिशांचे हातांत जाईपर्यंत ते भरतीसाठीं आले नाहींत. नंतर मात्र हजारो रंगरूट झाले असे अचिसननें लिहिले आहे. शिपायांच्या बंडाचा विस्तार अफाट आणि सामर्थ्य जरी अचाट होते तरी त्यापेक्षां उठावाच्या राष्ट्रीय स्वरूपाचीच जास्त धास्ती सरकारला वाटत होती. बंडाचा मोड करताना सरकारचें जास्त लक्ष लोकांचा धीर खचविण्याकडेच होते. लॉर्ड कॅनिंग हे विशेषेंकरून शिपायास माफी देत असत. बंडास प्रवृत्त झालेल्या नागरिकांचे बाबतींत मात्र त्यांचे न्यायदान कठोर असें.[1]

युद्ध स्वधर्मरक्षणासाठीं होते तसें स्वराज्यासाठींही होते. या युद्धाच्या सुरुंगामध्यें असंतोषाचें स्फोटकद्रव्य ठांसून भरलेले होते. सैनिकांच्या प्रत्येक तुकडीबरोबर त्यांच्या धार्मिक वृत्ति व जरूरीकडे लक्ष देण्यासाठीं एक पंडित व एक मौलवी नेमलेला असे. यापैकीं कांहीं मौलवी व पंडित यांचीं मनें क्रांतिकारकांनीं क्रांतियुद्धाचे ध्येयमार्गाकडे वळविली होती व कांहीं क्रांतिकारकांनीं गुप्तपणें या जागा मिळविल्या होत्या. बंडवाल्यांच्या हेरखात्यांत फकिरांनीं फार महत्त्वाचें काम केलें होते. बंडवाल्यांचें धैर्य आणि स्थैर्य धार्मिक भावनांनीं वाढले हें जरी खरें असले तरी या उठावासाठीं दोन्ही धर्मांमधील लोकांत एकोपा निर्माण झाला असल्यानें लोक धर्मभावनांनीं वेडे झाले

1 Campbell : op. cit. pp. i 283.

नगर वाचनालय ता. ......

नव्हते. उदा० ख्रिस्ती लोकांना जो त्रास झाला तो ते ख्रिस्ती धर्माचे होते म्हणून नव्हे तर त्यांनीं उघडपणें ब्रिटिशांची बाजू घेतली होती म्हणून. इंग्रज, सुशिक्षित हिंदू, विशेषतः बंगाली यांनाही बंडवाल्यांकडून असाच आणि याच कारणानें त्रास झाला. "इंग्रजी शिकलेले बहुतेक लोक आणि ख्रिश्चन झालेले एकूण एक लोक ब्रिटिशाशीं राजनिष्ठ राहिले" असें म्हटलें जाते.[1]

उठावामुळें सामाजिक असंतोष स्पष्ट होत होता. बंडाच्या तात्विक स्वरूपांत वंशपरंपरागत तसाच नवीन विचारांचा समावेश होता. बंडाच्या स्वरूपाची कल्पना करतांना सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास हे दोन्ही विचारप्रवाह दिसतील.

बंडाच्या धार्मिक स्वरूपामुळें जरी त्याला लोकांचा पाठिंबा होता तरी त्याचा प्रधान हेतू राजकीय होता. बंडाचे पुढारी लोकांच्या ऐहिक मागण्यांचा पुरस्कार करीत, आत्मिक गरजांचा नव्हे. ब्रिटिश राजसत्ता उखडून टाकतांच त्या ठिकाणीं जुने राजेच नव्हे तर जुने जमीनदारहि आले व ही गोष्ट लोकास पसंत पडली. औध आणि वायव्य सरहद्द प्रांतांत जमिनदारांनीं पाठिंबा दिल्यामुळेंच बंडास जनतेच्या उठावाचे स्वरूप येणें शक्य झालें.

औध जेव्हां ब्रिटिश सत्तेस जोडला गेला तेव्हां त्याचा दोन तृतियांश भाग २७२ तालुकदारांचे ताब्यांत होता. त्यापैकीं फक्त सात तालुकदार ब्रिटिशांचे बाजूस होते.

वायव्य सरहद्द प्रांतांत जमिनीबाबतच्या नव्या कायद्यामुळें जुने जमिनदार व अमीरउमराव यांचे जमिनीबाबतचे मालकी हक्क नष्ट झाले

1 Holmes op. cit. P. 143.

होते. त्यांना व जमिन कसणारांना नवा उपटसुंभ मालक मान्य नव्हता. वायव्य सरहद्द प्रांतांत बंडाचे काळांत "जमिनी आणि मालमत्ता यांचे मालकीहक्काबद्दल बराच गोंधळ निर्माण झाला होता. सरकारी सारा वसूल करण्यासाठीं अगर मुलकी कोर्टाचे हुकुमावरून झालेल्या लिलावांत ज्यांनीं जमीनजुमला विकत घेतला त्यांचे मालकीहक्कावर बंडाचे काळांत लोकांनीं गदा आणली. आपल्या जमिनींचा लिलांव झाल्यामुळें ज्यांचे हक्क हिरावून घेतले गेले होते अशा लोकांनींच मुख्यत्वेंकरून लिलांव घेतलेल्या मालकांना हुसकून दिले. आणि एकदां हे लिलांव घेतलेल्या मालकांना हुसकावल्यानंतर शेतकऱ्यांनीं जमिनीचा खंड, पुन: ताबा घेतलेल्या जुन्या मालकांना दिलें असें दिसतें."[1]

तेव्हां बंडाचें नेतृत्व वंशपरंपरागत नेत्याकडेच होते. जनतेच्या सर्व उठावाप्रमाणें या १८५७ च्या उठावांतही सरकारी दप्तरें आणि कागदपत्र जाळण्यांत आलें. मात्र या उठावामुळें पूर्वींचेच जुनें मालक पुन्हां हक्कांसहित स्थानापन्न झाले. मध्यंतरीच्या काळांतील श्रीमान मालकांना हाकून देण्यासाठीं खंडकऱ्यांनीं व कुळांनीं जुन्या मालकांना मदत केली.[2] या कारणांमुळें हें बंड म्हणजे खरोखर जमिनदार इनामदारांचेंच बंड होते.

निसर्गाप्रमाणें इतिहासांतही पुनरावृत्ति तंतोतंत कधींच होऊं शकत नाहीं, अगर हक्कांची पुनर्रचना थेट पूर्वींच्या स्वरूपांत होऊं शकत नाहीं. जनतेच्या चळवळीस सीधा रेखीव असा कार्यक्रम असणें

---

1 Duff op. cit. pp. P. 189.

2 Forrest op. cit. pp. iii xxi.

अशक्य आहे. त्याचा मार्ग त्यामधील शक्ति, त्यांच्या प्रतिक्रिया यावर अवलंबून असतो. चरबी लावलेलें काडतूस सैन्यांत वापरावयास सांगताच जनतेच्या असंतोषाच्या दारूवर ठिणगी पडून भडका उडाला. तेंच काडतूस "ब्रिटिशाविरुद्ध वापरतांना शिपायांचे मनांत, अधर्म होतो आहे हा विचार येऊन क्षणभरही गोंधळ उडाला नाहीं."[1] महापूराच्या लोंढ्याप्रमाणें हें बंड होऊन गेले खरें, परंतु त्यामुळें नवीन कल्पनांचा व विचारांचा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. बंडामुळें पुढारलेल्या लोकशाही तत्त्वाची बीजें रुजली गेली.

दिल्ली आणि लखनौमध्यें बंडवाल्यांनीं स्थापन केलेल्या राज्यांमध्यें "लोकशाहीच्या स्वरूपाची स्पष्ट अंगे दिसतात. दिल्लीचें सरकार म्हणजे सरदार इनामदारांचें एक राज्ययंत्र होते. राजास राजयंत्रांतील राजासारखा मान मिळत असे. लोकप्रतिनिधींऐवजी शिपायांच्या एका मंडळाचे हातांत सर्व सत्ता होती, परंतु राजा हा त्यांचा सेनापती नव्हता. अरेबिक किंवा पार्शियन वाक्प्रचार रूढ झाले नाहींत उलट इंग्रजी वाक्प्रचार आणि कामकाजाच्या पद्धतींचा अवलंब करण्यांत आला. सर्व अर्ज आणि विनंत्या राजालाच केल्या जात. परंतु तो हे सर्व अर्ज आणि विनंत्या कोर्टाकडे पाठवी. हे कोर्ट म्हणजे बरेंच कर्नल, ब्रिगेडमेजर आणि चिटणीस यांचें असें. हें कोर्टही सर्वंकष अधिकारी संस्था मानली जाई. या कोर्टांतील कर्नल वगैरे अधिकारी आपल्या शौर्याच्या आणि हुशारीच्या जोरावर पुढें आलेले सैनिक होते."[2]

1 Edmond C. Cox : A Short History of the Bombay Presidency. ( 1887 ) P. 348.

2 Campbell op. cit. ii pp 356.

औधचे राजे अज्ञान असल्यामुळें प्रधान आणि संस्थानचे मंडळाकडे कारभार सोंपविला होता. हें मंडळ दिवंगत महाराजांचे मुख्य अंमलदार, तालुकदार आणि शिपायांनीं निवडून दिलेले प्रतिनिधी यांचें मिळून बनविलेले होते. सैन्यांत शिपाईच अधिकारी निवडून देत व हे अधिकारी जनरलस्‌ची निवड करीत.[1] सैन्याच्या पगारामधील तफावत ब्रिटिश इंडियन आर्मीचे मानानें कांहींच नव्हती म्हटली तरी चालेल. नानासाहेबांचे हातांखालील कर्नल्स्‌ आणि मेजरस्‌ यांना सारखाच पगार असे ( ९०० रु. ). साध्या स्वारास २१ रु. पगार मिळे. बंडामुळें लोकशाहीची आणि समतेची कांहीं तत्त्वें प्रत्यक्षांत उतरली.

ब्रिटिश कोर्टानें जी समता निर्माण केली होती, तिचा उल्लेख असंतोषाचे एक कारण म्हणून केला जात असे. फिर्याद दाखल करून एखाद्या सन्मान्य जमिनदाराला कोर्टांत खेंचणें, वा तुरुंगांत डांबून त्याची नालस्ती करणें सर्वसाधारण रयतेस म्हणजे एखाद्या नोकरास वा मोलकरणीसही शक्य झालें आहे; म्हणून बंडामध्यें सामील झालेल्या जमिनदारांना शिपाई आणि सर्वसाधारण रयत यामध्यें पसरणारी समतेची लाट पसंत पडणें असंभवनीय होते. ज्या नेत्यांच्या सद्-सद्विवेकबुद्धीला मध्यंतरीच्या मालकांना हुसकावून लावतांना थोडाहि त्रास झाला नाहीं त्याच नेत्यांनीं बंडानंतर मालमत्तेच्या हक्कासंबंधीं प्रश्न निघतांच या हक्कसंरक्षणासाठीं आग्रह धरला. कांहीं शिपाई कागदपत्र जाळावयास निघतांच राजकुमारसिंग यांनीं त्यांना थांबविलें

---

1 J. Talboys Wheeler : India Under British Rule (1886) P. 256.

व सांगितलें कीं, " ब्रिटिशांना हांकून दिल्यानंतर जर तुम्ही हे कागदपत्र जाळलेत तर देवघेवीच्या व्यवहारास कांहीं पुरावाच राहणार नाहीं." एका तत्कालीन लेखकानें म्हटलें आहे कीं, " वरिष्ठवर्गाविरुद्ध कनिष्ठ वर्गाचें हें बंड आपणाला फायदेशीर होणार नाहीं हें बरेच राजे लोक ओळखून होते."[१]

सर्व 'असंतुष्ट व कर्जानें नाडलेल्यांच्या' गाऱ्हाण्यास बंडानें जरी तोंड फोडले होते तरी ते खरेखुरे दलितांचें बंड बनू शकले नाहीं. ज्या परिस्थितींत, ज्या तत्त्वप्रणालीनुसार व ज्यांच्या नेतृत्वाखालीं हा उठाव झाला त्यावरून पाहतां या बंडाच्या स्वरूपाचें रूपांतर खऱ्याखुऱ्या दलितवर्गाच्या बंडांत होण्याचा कायापालट होणें सोपें नव्हतें हे उघड आहे. बंडामुळें संपन्न लोकांचें मनांत चिंता निर्माण झाली. त्याला कल्पनाही नसलेलीं वादळें आकाशांत जमूं लागलेली त्यांना दिसली. दूरवर होणाऱ्या विजेच्या अस्पष्ट गडगडाटामुळें ते बेचैन झाले. अशा भविष्यकालीन बदलाच्या धसक्यानें भित्र्या राजांनीं ब्रिटिशांचा आश्रय घेतला.

सरंजामदारांनीं दिलेला धोरणी पाठिंबा, नवीन नवोदित लोकजागृती, नुकत्याच रुजू घातलेल्या राष्ट्रीय वृत्तीच्या आकांक्षा आणि सामाजिक व धार्मिक जुलमाबद्दलची चीड या विविध रंगांनीं १८५७ च्या बंडाचे चित्र रंगविलें आहे.

---

1 The Calcutta review (1858) P. 64.

## बंडांचें नेते : : ५

बंडाचे पुढारी जर यशस्वी झाले तर, मुत्सद्दी म्हणून लोक त्यांचा गौरव करतात; तेंच, जर ते अयशस्वी झालें, तर मात्र गुन्हेगार म्हणून लोक त्यांना तुच्छ लेखतात. १८५७ च्या बंडाचे पुढारी या नियमाला अपवाद नव्हते. ज्यांनीं या वादळावर मात करून त्याच्या गतीला कांहीं विशिष्ट वळण देण्याचा यत्न केला, असें प्रभावी पुरुष बंडाच्या निःपक्षपाती इतिहासांत नमूद करावे लागतील. रात्रीच्या निबिड अंधःकारामध्यें हें लोक विजेप्रमाणें चमकून गेलें असा भास प्रथमदर्शनी होतो. परंतु हा भासच होय. दीर्घकाल केलेली तयारी, काळजीपूर्वक जोपासलेली संघटना, यांचेच हा उठाव हे फल होय.

बंडाच्या कार्यांत वेगवेगळ्या पुढाऱ्यांनीं विणलेले धागे नेमके उकलून दाखविणें फार कठीण आहे. त्यांनीं सैन्याचें मन कसें वळविलें, विसंगत वाटणाऱ्या शक्तींची संगती कशी साधली, आणि वरवर परस्पर विरोधी दिसणाऱ्या मागण्यांचे असंतोषजन्य सूर एकाच घोषगर्जनेंत कसें मिळवून घेतले हे समजण्यास आज मित्तीस कांहीं मार्ग नाहीं. लोकमत जागृत आणि उत्साही करण्यासाठीं त्यांनीं ज्या कांहीं मार्गांचा अवलंब केला ( उदा. रक्तवर्ण कमळें हातोहातीं फिरती ठेवणें, चपात्यांनीं केलेल्या गुप्त खुणा, इत्यादि ) त्यावरून, त्यांना मनुष्यस्वभावाची फार खोल पारख होती असें स्पष्ट दिसतें नानासाहेब व अझिमुल्लाखान यांनीं बंडाच्या संघटनेबाबत प्रामुख्यानें काम केलें. बंडापूर्वीं, उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं मुख्य ठिकाणीं, त्यांनीं जो

एक दौरा काढला, त्यामुळें उत्साह निर्माण होऊन बंडाच्या विखुरलेल्या बीजरूप शक्तिकेंद्रामधील संबंध सुदृढ झाले.

नानासाहेब ( सन १८२४ ) यांची इंग्लिश लोकांमध्यें, एक संपन्न, मंदबुद्धी खुशालचेंडू म्हणून प्रसिद्धी होती. त्यांचेकडे होणाऱ्या मेजवान्यांचा गावभर बोलबाला होई, व १८५६ सालच्या अखेरी अखेरीस त्यांनीं चालविलेलें लोकांचे आदरातिथ्य अधिकच वाढले. त्यांच्या वरकांती खुशालचेंडू स्वरूपाआड फार मोठा धोरणीपणा, अलौकिक धीर, व कठोर कृतनिश्चय दडला होता. बंडाच्या पूर्वतयारीसाठीं त्यांनीं कांहीं इलाख्यांत दौरा काढला होता. त्यांनीं स्वतः जवळील सरकारी कर्जरोखे विकून टाकून पन्नास लक्ष रोख रुपये हाताशीं ठेवले होते, तरीही त्यांच्या उद्देशांचा व हालचालींचा सरकारला मागमूसही लागला नाहीं. बंडाच्या ऐन सुरवातीचे वेळीं एका इंग्लिश जनरलकडून व एका ब्रिटिश कलेक्टराकडून नानासाहेबांस कानपूरच्या सरकारी खजिन्याचें संरक्षण करण्यासाठीं आमंत्रण आलें होते. ते पाताळयंत्री लोकांचे व कटवाल्यांचे मेरुमणी शोभत होते. त्यांच्या नांवलौकिकाच्या दंतकथा सर्वतोमुखी झाल्या आहेत. त्यांच्या निधडया छातीच्या सर्व उलाढालीमागें अझिमुल्लांच्या तीक्ष्ण बुद्धीमत्तेची कारवाई असे.

अझिमउल्लाखांचा आयुष्यक्रम अरेबियन नाइटस्‌मधील गोष्टींतल्याप्रमाणें अतिरंजित होता. सुरवातीस ते एक आचारी होते. त्यांनीं धोरणीपणानें या हलक्या दर्जाच्या जागेचासुद्धां उपयोग करून घेतला. त्यांच्या युरोपियन मालकांकडून ते इंग्लिश आणि फ्रेंच शिकलें. अखेरीस ते नानासाहेबांचे प्रमुख सल्लागार बनलें. पेशव्यांचा

खटला डायरेक्टरांच्या कोर्टापुढें चालविण्यासाठीं नानासाहेबांनीं त्यांनाच इंग्लंडला पाठविले. मे फेअर मध्यें त्यांनीं सर्वांचे लक्ष वेधून घेतले. लंडनमधील अमीरउमरावांच्या स्त्रियांना ते चतुर आणि आकर्षक वाटले. इंग्लंडमधील मुक्कामांत त्यांनीं ब्रिटिशांच्या शक्तिचा अंदाज घेतला. क्रिमियन रणभूमीवर जाऊन त्यांनीं त्यांची लढाऊ शक्ति अजमावली. हिंदुस्थानांत परत येण्याचे अगोदर त्यांनीं तुर्की आणि अफगाणी लोकांचा बंडास पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला.

अझिमुल्लाखान या बुद्धिमान मुत्सद्याचे जोडीला फैयाजाबादचे मौलवी अहमदशाह हे अतुल प्रभावी संघटक व सैन्याचे चतुर सूत्रधार होते. त्यांचे वक्तृत्व फार परिणामकारक होते. त्यांच्या भावनापूर्ण शिकवणीमुळें व तेजस्वी भाषेमुळें बंडाची ठिणगी पडतांच औध मधील असंतोषाचा भडका उडाला. ब्रिटिशांनीं त्यांना पकडून फांशीची शिक्षा फर्माविल्यानंतर बंडवाल्यांनीं त्यांना सुळापासून पळवून नेले. तुरुंगाच्या कोठडीमधून ते बाहेर पडले ते लोकांच्या हक्काचे कर्णधार म्हणूनच. शांततेच्या तसेंच युद्धाच्या कालांतही ते निर्भय व धडाडीचे पुढारी ठरलें.

बंडामधील सैन्याचे नेते अहमदशाह, कुमारसिंग, तात्या टोपे, व लक्ष्मीबाई यांना युद्धकलेचा अनुभव बेताचाच होता. युद्धाच्या भट्टींतून तावून सुलाखून निघालेले अनुभवी ब्रिटिश सेनानी त्यांचेविरुद्ध लढण्यास सज्ज होते. त्यामुळें समोरासमोरच्या लढाईत ब्रिटिश सेनानीपुढें हिंदी सैन्याचा टिकाव लागत नसे. मात्र गनिमीकाव्याचे लढाईत बंडखोर त्यांना चांगलाच हात दाखवित. चपळ हालचाली, नवीन युक्त्याप्रयुक्त्या आणि धाडस यांच्या जोरावर बंडवाल्यांनीं

ब्रिटिश सैन्यास सतावून सोडले व मे १८५७ ते नोव्हेंबर १८५९ ही दोन वर्षें हिंदुस्थानांतील कांहीं प्रदेशांत युद्धाची धुमश्चक्री सुरू ठेवली.

बंडवाल्यांच्या हल्ल्याची मदार गनिमीकाव्यावरच होती, आणि त्याचें यशापयश अचानक केलेल्या हल्ल्यावर अवलंबून असते. तुरुंग फोडणें, सरकारी खजिनें लुटणें, वाहतुकीचे मार्ग निकामी करणें या गोष्टी व्यवस्थितपणें केल्या जात असत. बंडवाल्यांनीं अकरा ते बारा हजार लोकांना तुरुंगांतून मुक्त केले. सरकारी खजिन्यांतून कोट्यवधी रुपये लुटले. रेल्वे रूळ आणि तारायंत्रें हीं तर हल्ल्यासाठीं मोठीं मोक्याची ठिकाणें मानलीं जात. बंड सुरू होतांच राणीगंज या रेल्वे केंद्रावर फार मोठा हल्ला झाला. जवळजवळ दोन हजार मैल लांबीच्या तारा तोडण्यांत आल्या. वाहतुकीचे इतर मार्गही धोक्याचे होऊन बसले होते.

खां बहादुर खां यांनीं खालील आशयाचा जाहीर हुकूमच काढला होता. “ फिरंग्यांच्या सैनिक तुकड्यांशीं समोरासमोर लढण्याचा प्रयत्न करू नका. त्यांची शिस्त, त्यांचा बंदोबस्त व त्यांची हत्यारे आपल्यापेक्षां चांगल्या दर्जाची आहेत. त्यांच्या हालचालीवर मात्र लक्ष ठेवा. नदीच्या प्रत्येक घाटाचें संरक्षण करा. त्यांच्या वाहतुकीचे मार्ग तोडा. त्यांचे टपाल आणि डांक वाटेंतच लुटा. त्यांच्या सैन्याच्या तळाभोंवताली राहून त्यांना सतावून सोडा. ”

या हुकूमाची यशस्वीपणें अंमलबजावणी करण्यांत आली, असें ब्रिटिशांच्या एका अहवालावरून दिसतें. “ शत्रूशीं सामना त्याला शोधून काढल्याशिवाय होतच नाहीं. त्यांना शोधले, त्यांची

नगर वाचनालय सातारा संगणकीकृत

धांगापांग केली, त्यांची शस्त्रें हिरावून घेतली तरी, पुन: पुन: ए[illegible] होऊन ते नव्या जोमानें हल्ला करतात. एखादें शहर हस्तगत करावें, किंवा एकाद्या शहरांतून शत्रूस बाहेर घालवून शांतता प्रस्थापित करूं पहावें, तों दुसरें एखादें शहर हातचें जातें कीं काय अशी धास्ती वाटू लागते. दोन ठिकाणांमधील मार्ग दुरुस्त होऊन सुरू होतो न होतो तोंच पुन्हां कांहींतरी अडथळा निर्माण होऊन तो वर्षभर निकामी होतो. बंडखोरांना एका वस्तींतून हांकून लावलें न लावलें तोंच ते दुप्पट तिप्पट जोरानें दुसऱ्या वस्तीमध्यें उलाढाली सुरू करतात. शत्रुपक्षाचें भागांतून मार्ग काढीत सैन्य पुढें चाललें कीं मागून बंडखोर पुन्हां त्या भागाचा कबजा घेत. शत्रुपक्षाकडील सैनिकांच्या संख्येची उणीव झपाट्यानें भरून निघते आणि त्यांची कांहीं निश्चित हानी अगर त्यांचेवर कांहीं निश्चित स्वरूपाचा परिणाम झालेला दिसून येत नाहीं. या असंख्य बंडखोरांचे प्रांतांतून आमच्या शूर सैन्याचें मार्गक्रमण, रेताड जमिनीतील भक्कम नांगराच्या नांगरटीसारखें न दिसतां गरुडाच्या भरारीप्रमाणें किंवा शांत महासागरांत चालणाऱ्या डौलदार बोटीप्रमाणें वाटतें."[१]

कुमारसिंग हे गनिमी लढाईचे प्रमुख होते. वय पन्नाशीचे सुमारास आले असतांना ते त्यांच्या तरुण साथीदारांना शौर्य आणि चापल्य यांत मागें टाकीत. बिहारींनीं डन्बारच्या सैन्याची वाताहात केली, त्यावरून गनिमी काव्यानें बंडखोर किती वाकबगारपणें लढत असत याची कल्पना येते. या धैर्यवान्, वृद्धि सेनानीनें त्याच्या आवडत्या जगदीशपुरांतून ब्रिटिशांना हांकून देऊन स्वातंत्र्याच्या

1 Duff op. cit. P. 223.

मेहना　　भा. भा.

वाचनालय सातारा



झेंडयापाशीं देह ठेवला. स्वातंत्र्य युद्धासाठीं त्यांनीं आपलें शरीर कसून तयार केलें होतें. स्वातंत्र्ययुद्धासाठीं उपसलेली नंगी समशेर हातांत असतांनाच त्यांनीं आपला देह ठेवला.

नानासाहेबांचे बालमित्र व आयुष्यभरचे साथी तात्या टोपे ( १८१९ ?–५९ ) यांच्याकडे बंडाच्या सैन्याचे नेतृत्व होतें. मराठ्यांचे साहस आणि मुत्सद्दिगिरी त्यांचे नसानसांतून खेळत होती. शिवाजी महाराजांच्या परंपरेचे ते अनुयायी होते. शिवाजी महाराजांची वस्त्रें धारण करणारा हा त्यांचा शेवटचा वारस होता. त्यांच्या युक्तियोजना म्हणजे बंडखोरांच्या हातांतील खरोखर जादूचा ताईतच होता. सर्वनाश झाला आहे असें वाटत असतांना धाडस व कल्पनाशक्ति यांचे जोरावर त्यांनीं ग्वाल्हेरचें राज्य व इतिहासप्रसिद्ध किल्ला, खजिना, बंडवाल्यांना सैन्यासह मिळवून दिला. धुमसत्या दक्षिणेस धडधडत्या उत्तरेपासून वेगळे ठेवणारी नर्मदा एकटे तात्या टोपेच ओलांडू शकले. ब्रिटिश लोक नऊ महिने त्यांचा तीन हजार मैल पाठलाग करीत राहिले. शरिरानें चपल आणि बुद्धीनें चाणाक्ष अशा तात्या टोप्यांनीं ब्रिटिश सैन्यांतील मुरब्बी सेनानींना नामोहरम केलें. मित्रपक्षानें विश्वासघात केल्यामुळें जरी त्यांना गुन्हेगाराचें मरण प्राप्त झालें, तरी त्यांनीं जर डांटनप्रमाणें असें उद्गार काढलें असते कीं, " माझे शिरकमल सर्व लोकांना दाखवा. अशी शिरकमले हरघडी दृष्टीस पडत नाहींत. " तर ते अगदीं योग्य झालें असतें.

हिंदवी मनांत प्रेमाचे अमरस्थान मिळविलेल्या झांशीच्या तेजस्वी राणीसाहेब लक्ष्मीबाई तर सैन्याच्या साक्षात् स्फूर्तिदेवताच होत्या.

C(५७)

त्या सुंदर आणि शूर तर होत्याच परंतु त्यांची हुषारी त्यांच्या वयाचे मानानें कौतुक करण्यासारखी होती बंड सुरू होतांच त्यांनीं रणांगणाकडे धांव घेतली.

त्यांनीं भाला बरोबर घेतला पण ढाल मागें ठेवली. पुरुषाच्या वेषांत, पुरुषाला साजेशा धैर्यानें लढतांना त्या कामीं आल्या. त्यांची इच्छाशक्ति म्हणजे पोलादाची कांबच होती. त्यांच्या दृढनिश्चयाला शरणागती ठाऊक नव्हती. त्यांचे छोटे राज्य जेव्हां ब्रिटिश प्रांतास जोडले गेले तेव्हां, ' मेरा झांसी दूँगी नहीं ' असें त्या म्हणाल्या. त्यावर त्यांनीं स्वतःच्या अमरकीर्तीची मोहोर केली. त्यांच्या सुटके-वरून त्यांचे घोड्यावर बसण्याचे कसब आणि सहनशक्ति यांची चांगलीच खात्री पटते. झांशी हातची जातांच झांशी ते काल्पी हें १०२ मैलाचें अंतर पाठीस लागलेल्या ब्रिटिशांना झुकांड्या देत त्यांनीं अवघ्या २४ तासांत काटलें. राज्यावर असतांना व प्रत्यक्ष रणांगणावरही लोकांमध्यें त्या सलोख्याचे संबंध वाढवीत व लोक वीरकृत्यास प्रवृत्त होत असत. त्यांनींच लोकांना बंड करण्यास प्रवृत्त केले. प्रत्यक्ष बंड सुरू झाल्यावर त्या त्याच्या एक सूत्रधार बनल्या. त्यांचें नांव इतिहासांत, लोकगीतांत, अजरामर झाले आहे. बंड म्हणजे त्या आणि त्या म्हणजे बंड, असें झालें आहे. त्यांच्या स्वातंत्र्येच्छु आत्म्याच्या ज्योतीनें स्वातंत्र्याचें अखंड होमकुंड पेटविलें आहे.

ज्या दोन लाख शिपायांनीं गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठीं धारातीर्थी देह ठेवला, त्यांच्या शौर्याचें व धैर्याचें कौतुक कधींच झालें नाहीं. त्यांच्या पराक्रमाचें द्योतक म्हणून स्मारकें नाहींत, त्यांच्या आठवणीसाठीं कोणी रोषणाई करीत नाहीं. त्यांच्या स्मृति-

दिनीं त्यांना कोणी पुष्पांजलि अर्पण करीत नाहीं कीं त्या दिवशीं नगारे नौबती झडत नाहींत. त्यांची स्मृति पुसून टाकण्याचा राजकर्त्यांनीं आटोकाट प्रयत्न केला. पण त्यांची स्मृति प्रत्येक हिंदी मनुष्याच्या अंतःकरणांत कोरलेली आहे.

---

## बंडांतील क्रौर्य : : ७

जेव्हां पृथ्वी हादरून टाकणाऱ्या, असामान्य घटना घडून येतात. तेव्हां हिंसा होणारच; क्रान्तिकारक बदल हिंसेवांचून होणें कठीण आहे. सूज्ञपणें, सहिष्णुतेनें विचार करतां या विद्रूप घटना विसरणें शहाणपणाचें ठरेल. हिंसेनें सर्वांचेच हात मलीन झाले होते व 'हर! हर ! काय हें ! ' असें कोणीही म्हणण्याची गरज नव्हती. दुर्दैवानें इंग्लिश इतिहासकारांनीं लिहिलेला बंडाचा इतिहास म्हणजे अत्याचारांच्या गोष्टीचें एक कंटाळवाणें लांबलचक गाणेंच आहे. आणि हे पालुपद इतके कांगावखोर आहे कीं याला दुसरी बाजू आहे कीं नाहीं असा प्रश्न सहजच कोणासही विचारावासा वाटेल. मग मात्र असें ध्यानांत येतें, कीं बंडामध्यें हिंदी लोकांना आपली चूक झाली असें वाटावें आणि ब्रिटिशांना स्वतःच्या कृत्याबद्दल खेद व्हावा अशा कितीतरी गोष्टी आहेत. या ज्वालामुखीचा भडका उडतांच त्याच्या मुखाजवळ असलेले सर्व त्याच्या लाव्हामध्यें सांपडले. हिंदी लोकांना दोष लावण्यासाठीं ही स्मृति ब्रिटिशांनीं पॉम्पेइच्या दृश्यासारखी जतन करून ठेवली आहे. ब्रिटिशांनीं केलेल्या अत्याचारावर मात्र पांघरूण ओढून त्या डोळ्याआड केल्या जातात. हिंदी

लोकांच्या सुप्त मनांत त्या स्मृति खोलवर रुजल्या आहेत. त्यांचा हिंदी लोकांच्या विचारसरणीवर व भावनांवर गूढ परिणाम होत राहिला आहे. या भयानक दृश्यांकडे नाइलाजानें दृष्टिक्षेप करणें प्राप्त आहे.

इंग्लिशांना ठार करणें हा बंडाच्या योजनेचाच एक भाग होता. दिल्लीप्रमाणें अनेक ठिकाणीं त्यांच्या कत्तलीनेंच बंडास सुरुवात झाली. शेतकरी ज्याप्रमाणें विळ्यानें झपाझप पीक कापीत जातो त्याप्रमाणें बंडवाल्यांनीं ब्रिटिशांची कत्तल केली.

ब्रिटिशांनीं अविचारानें जी भयानक क्रूर कृत्यें केली, तीं जर केली नसती तर कानपूर येथें घडलेले दुःखद प्रकार आणि कत्तल झाली नसती.

हिंदी लोकांनीं मारलेल्या प्रत्येक युरोपियनागणिक शंभर हिंदी लोक मारले गेले आहेत. पण इतिहासांत मात्र हिंदी लोक खुनी म्हणून बदनाम झाले आहेत. इतिहास ही खरोखरी जेत्यांच्या हातांतील एक नाचरी बाहुलीच आहे.

कत्तलीला सुरवात हिंदी लोकांनीं केली हें नाकबूल करतां येणार नाहीं. त्यांनीं असें कां केलें ? बायकामुलांच्या कत्तलीला कांहींच कारण नव्हतें व ती गोष्ट अक्षम्यही आहे. आपल्या नांवलौकिकाला हा काळिमा कायमचा लागला आहे. युरोपियन पुरुषांना हद्दपार करणें किंवा तुरुंगांत डांबून ठेवणें, अशक्यप्राय होते. म्हणून त्यांची कत्तल करणें भागच होते. त्यांना एखाद्या जिल्ह्यांतून बाहेर काढणें, म्हणजे शेजारच्या जिल्ह्यांचा त्रास वाढविण्यासारखें होते. उलटपक्षी ज्यांच्या हातीं एकेकाळीं फार मोठी सत्ता होती अशा ब्रिटिश

अधिकाऱ्यांना फांसावर चढवून नंतर त्यांची टांगून ठेवलेली प्रेतें ब्रिटिशांची सत्ता संपुष्टांत आल्याचा प्रत्यक्ष पुरावा होता. विशेषतः क्रान्तिकालांत डोळ्यांनीं पाहिलेल्या गोष्टींवरच चटकन विश्वास बसतो.

बंड शमविण्यासाठीं ब्रिटिशांनीं ज्या क्रूर उपायांचा अवलंब केला त्यांना कांहीं सुमारच नव्हता. केवळ बंड शमविण्यासाठीं अशा अघोरी उपायांची कांहीं गरज नव्हती. त्यांनीं परत काबीज केलेल्या प्रांतामधून केलेली सारावसुली, अगर बंडखोर भागांत बसविलेला डोईजड कर ( उदा. कानपूर ३,००,००० ), या गोष्टींना फारशी नावें ठेवतां येणार नाहींत. पण त्यांनीं योजलेले कांहीं उपाय मात्र अत्यंत गैर आणि बेअक्कलीपणाचे होते. झांशी शहर काबीज होतांच ७९ युरोपियनांच्या पूर्वी झालेल्या कत्तलीचा बदला म्हणून ९००० हिंदी लोकांना ठार मारण्यांत आले, व एक आठवडाभर शिपायांना शहर लुटण्यास परवानगी देण्यांत आली.[१] दिल्लीमध्यें कांहीं युरोपियनांच्या मृत्यूचा सूड म्हणून २६,००० हिंदी लोकांना फांशी देऊन, गोळ्या घालून, तोफेंतून उडवून ठार करण्यांत आले.

या रक्तपिपासेला शहरांतील आणि खेड्यांतील सारखेच बळी पडत होते. ' ठार मारा ! ठार मारा ! ठार मारा ! ' हाच सूर कित्येक दिवसपर्यंत वातावरणांत घुमत होता. अमृतसरचे डेप्युटी कमिशनर फ्रेडरिक कूपर यांनीं केलेल्या एका भयंकर प्रकाराचा

---

1 For an eye witness account of the sack of Jhansi and the man—hunt organised there by the British army. cf. Vishnu Godse Varsaikar: Maza Pravas.

विसर पडणें अशक्य आहे. लाहोर येथील फौजेनें बंड करून दोन युरोपियनांस ठार मारले. शिपायांचेवर यासाठीं जो भयंकर सूड घेतला गेला, त्याचें कूपर यांनींच उत्तम वर्णन केलें आहे.

" जवळजवळ दीडशें लोकांना अशा तऱ्हेनें फांशीं दिल्यानंतर फांशीं देणाऱ्यापैकीं एक घेरी येऊन पडला, आणि या क्रमांत थोडा खंड पडला. पुन्हां सुरवात होऊन ही संख्या २३७पर्यंत गेल्यावर शिल्लक राहिलेल्या कांहीं तासापूर्वीं कोंडून ठेवलेल्या लोकांनीं, कोठडींतून बाहेर यावयाचें नाकारलें. दारें खुलीं केल्यावर भीतिनें, थकव्यानें उकाड्यानें आणि गुदमरून मेलेल्या लोकांना ओढून काढावें लागलें.[1] " कलकत्त्याची अंधारकोठडी नकळत खरी करून दाखविली गेली. ब्लॅकहोल हॅवेल साहेबांच्या उन्मत्त डोक्याबाहेर कोठेंच अस्तित्वांत नव्हते. म्हणून कूपरनें केलेलें हें भयंकर क्रूर कृत्य अलौकिकच म्हटलें पाहिजे.

ज्या लहान मुलांनीं बंडाचें निशाण हातांत धरण्यापलीकडे कांहींच गुन्हा केला नव्हता त्यांना कांहींहि विचार न करतां फांशीं देण्यांत आले. ब्रिटिश सैन्य येत असतांना बारा लोकांना उलट दिशेस तोंडे केल्याबद्दल तेथल्या तेथें जवळच्या झाडास टांगून फांशीं देण्यांत आले. नीलच्या बंदुकवाल्या तुकडीनें सांपडेल त्या हिंदी माणसास ठार केलें. त्यांनीं दया क्षमा कधींहि दाखविली नाहीं. एकट्या अलाहाबाद शहरांत त्यांनीं ६,००० लोकांना ठार मारलें.

वायव्य सरहद्द प्रांतामधून रेनोचे सैन्य गेल्यानंतर तेथील कांहीं जिल्हे विस्तृत ओसाड जमिनीप्रमाणें दिसत होते मधूनमधून कोठें-

1 F. Cooper : The Crisis in the Punjab.

तरी जाळपोळ केलेल्या खेडेगांवाचे उरलेले अंश दिसत. मृत्यूच्या भयंकर धगीनें सर्व जीवन होरपळून निघाले होते. शारीरिक कष्टापेक्षां हळव्या हिंदी लोकांवर केलेले मानसिक अत्याचार असह्य झाले. मुसलमान लोकांना डुकराच्या कातड्यांत शिवून नंतर नदींत फेंकून देत, अगर फांशीं देण्याचे अगोदर त्यांचे अंगावर डुकराची चरबी फेंकीत व नंतर त्यांना माती देत. फतेहगडच्या नबाबांना फांशीं देण्याअगोदर त्यांच्या तोंडांत डुकराचें मांस कोंबण्यांत आले. त्यांच्या सामाजिक दर्जाचा कांहींहि विचार न करतां त्यांना झाडूवाल्याची कामें करावयास लावली. मनुष्य शारीरिक हाल विसरतो परंतु मानसिक हालाची जखम फार खोल राहते. त्यामुळें मनामध्यें जें कांहीं गंड निर्माण होतात ते नाहींसें करणें सोपें नसतें. गालिब या प्रसिद्ध कवीच्या दुःखानें कांपणाऱ्या अविस्मरणीय काव्यांत या भीतिग्रस्त, निराशामय आणि भयंकर वातावरणाचें अप्रतिम वर्णन आहे.

कोई उम्मीद बार नहीं आती
कोई सूरत नजर नहीं आती
मौत का एक दिन मौयाऽन है
नींद क्यों रात भर नहीं आती

ब्रिटिशांना असें पिसाटल्यासारखें कां झाले होते? लढाईच्या उन्मत्त मदानें त्यांची डोकीं धुंद झाली होती व त्यांत सूडाच्या भावनेची भर पडली. पण मुख्य म्हणजे तुच्छ हिंदी लोकांनीं केलेल्या उठावाचा राग आणि भीति होय.

सर हेन्री लॉरेन्स यांनीं म्हटलें आहे कीं, "राज्यकर्त्यांच्या वर्गाचें स्थान आणि दरारा कांहींहि करून राखलाच पाहिजे."

राईस होम्स् यांनीं कबूल केलें आहे कीं गोऱ्या लोकांचे हाल झाले. यापेक्षां नीच वर्णाच्या लोकांनीं अपमान केला म्हणून हा सूड घेतला गेला.[1] नीच वर्णियांकडून झालेल्या अपमानामुळें ब्रिटिशांचा संताप अनावर झाला. काळ्या लोकांची रग एकदां जिरविलीच पाहिजे हा सूर त्यामागें होता.

आम्ही केलेले गुन्हे ब्रिटिशांनीं केलेल्या शिवीगाळींमुळें जास्त भडक दिसतात, व त्यांच्यातर्फें नमते घेऊन लिहिणारा बोलणारांनीं त्यांच्या भयंकर कृत्यांचे डाग धुवून काढण्याचा यत्न केला आहे. " लोकांच्यांत बदल होतो, ते हंसतात, पण त्यांच्या मनांतील रुखरुख कायम राहते. "[1]

---

## बंडाच्या अपयशाची कारणें : : ८

बंडाच्या अपयशांच्या कारणांचे दोन प्रकार आहेत. कांहीं गोष्टींची बंडवाल्यांना अटकळ बांधता आली नाहीं, कांहीं गोष्टी त्यांच्या आवाक्याबाहेरच्या होत्या, हा पहिला प्रकार; आणि दुसरा प्रकार म्हणजे, त्यांचें धोरण, दृष्टीकोन आणि बंडवाल्यांचा सामाजिक दर्जा यांमुळें येणाऱ्या अडचणी.

१८५७ साल ब्रिटिशांना बऱ्याच दृष्टींनीं चांगले होते. क्रिमिया आणि चीन मधील लढाया नुकत्याच संपल्या होत्या. कसलेल्या ब्रिटिश फौजेची शक्ति बंडवाल्यांचे विरुद्ध वापरण्यासाठीं सुसज्ज होती. वर्षाच्या प्रारंभीच पर्शियाचा पराभव झाला होता. अफगाणि-

---

1 Holmes op. cit. P. 110.

स्तानशीं मैत्रीचा व सलोख्याचा तह झाला होता. त्यामुळें खैबर व बोलन खिंडींत गडबड होऊन ब्रिटिशांचें लक्ष द्विधा होण्याचा कांहींच संभव नव्हता. आंतरराष्ट्रीय व भौगोलिक दृष्टीनें हिंदी बंडखोर इतर जगापासून अगदी अलग पडले होते.

समुद्रावर ब्रिटिशांची सत्ता असल्यामुळें या अलगपणानें हिंदुस्थानाभोंवतीं एक कडेंच निर्माण झालें होतें. यामुळें हिंदुस्थानाच्या भूप्रदेशांत झालेल्या जयापजयांच्या परिणामांचे जागतिक महत्त्व फार थोडे उरले होते ही गोष्ट हर्बर्ट एडवर्डस यांच्या लक्षांत फार लौकर आली. प्रयत्नांची पराकाष्ठा करून, पंजाब प्रांत व बंदरे हातची जाऊं देऊं नयेत अशी त्यांनीं मागणी केली. ही ठिकाणें हातीं असल्यास मध्यवर्ती प्रांत पुन्हा काबीज करणें सोपें जाणार होते. त्यांनीं म्हटले आहे कीं, " पंजाबांत पाय घट्ट रोंवून ठेवा. पंजाब जर तुमच्या ताब्यांत राहिला तर समुद्राच्या बाजूनें देश पुन्हां जिंकणें सोपे आहे. मध्यवर्ती प्रांतांत कांहींही झालें तरी पंजाबची आघाडी आणि बंदरे जोपर्यंत आपल्या हातांत आहेत तोपर्यंत आपला मान आणि धीर कायम राखता येईल. ही दोन्ही ताब्यांत असलीं म्हणजे हें बंड घरगुती भांडणाप्रमाणें मिटवितां येईल. " बंदरें ताब्यांत होती म्हणून ब्रिटिशांना सैन्य आणि रसद अव्याहत हिंदुस्थानांत आणतां आली. ग्रँट ट्रंक रस्त्यावरून एका पाठोपाठ येणाऱ्या ब्रिटिशांचा लाल गणवेषांतील तुकड्या पाहून ब्रिटिशांना मदत करण्यासाठीं सैन्य समुद्रांतूनच वर येत आहे असें हिंदी लोक म्हणूं लागले.

ब्रिटिश फौजेला भरपूर कुमक अव्याहतपणें पुरविली जात होती. १,१२,००० सैन्य म्हणजे ब्रिटिश फौजेचा अर्धा भाग बंड मोड-

ण्यासाठीं हिंदुस्थानांत पाठवितां आला. शिवाय हिंदुस्थानांत याच कामासाठीं ३,१०,००० लोकांची भरती करण्यांत आली होती. ब्रिटिशांचेजवळ अद्यावत युद्धसाधनें होती. १९ व्या शतकांतहि फौजी हत्यारांत क्रान्तिकारक ठरलेल्या ' एनफील्ड ' रायफली त्यांचेपाशीं असत. बंडवाल्यांनीं तोफा ओतण्याचा आणि बंदुकी तयार करण्याचा कसून प्रयत्न केला होता. तरीही त्यांचेजवळची हत्यारे फारशी चांगली नव्हती. याबाबत बरीच माहिती गोळा करून डब्ल्यू. एच. रसेल यांनीं नमूद करून ठेवले आहे कीं, " मोठ्या व गंभीर स्वरूपाच्या ज्या जखमा झाल्या होत्या, त्या तलवारींच्या होत्या. बंडाचा बीमोड झाल्यावर औधमध्यें जीं हत्यारें काबीज केली गेली, त्यामध्यें ६८४ तोफा, १,८६,१७७ बंदुकी, ५,६१,३२० तलवारी, ५०,३११ भाले, ६,३८,६८३ किरकोळ हत्यारें होतीं. यावरून बंडवाल्यांची साधनसामग्री किती असमाधानकारक होती, याची कल्पना येईल. शस्त्रास्त्रांची उणीव लोकसंख्येनें भरून काढण्याचा बंडखोरांनीं प्रयत्न केला. यापेक्षां चांगली सामग्री त्यांचे हातांत असती तर बंडाचा शेवट यापेक्षां वेगळ्या तऱ्हेनें झाला असता. बंगालमधल्या बंडवाल्यां-जवळ जर मिनी बंदुका असल्या तर आज दिल्ली क्रान्तिकारकांच्या ताब्यांत असती, आणि मोंगलसम्राट तुरुंगाच्या कोठडींत एका खाट-ल्यावर बसून राहण्याऐवजी आज पिढीजाद रत्नजडित सिंहासनावर बसले असते.[१]

बंडवाल्यांना एनफील्ड रायफल या एकाच आधुनिक शस्त्राला तोंड द्यावे लागले असें नाहीं. तारायंत्राचाही त्यांचेविरुद्ध उपयोग

1 Ball. op. cit ii 609.

ता.
सातारा

केला गेला. त्यांच्याविरुद्ध तारायंत्रानें केलेल्या कामाची कल्पना लंडन टाईम्सच्या बातमीदारानें चांगली स्पष्ट केली आहे. "तारायंत्राचा शोध लागल्यापासून त्याचा उपयोग आज हिंदुस्थानांत होतो आहे तेवढा कधींच झाला नव्हता. तारायंत्रावांचून सरसेनापतींची अर्धी शक्ति निकामीं होईल तारायंत्र म्हणजे त्यांचा उजवा हातच होता." बंड सुरू होतांच लोकांनीं पहिल्याप्रथम बरॅकपूरच्या तारायंत्राच्या नव्या कचेरीस आग लावली ती उगाच नव्हें. बंड फार उशिरा सुरू झालें. बंडाचे भविष्यावर शास्त्रीय शोधांनीं निखारे ठेवले होते.

या सर्व गोष्टींवर मात करण्यास बंडवाल्यांस फक्त एकच मार्ग खुला होता. तो म्हणजे ब्रिटिशांच्या शक्तीचा संपूर्ण नाश करूं शकेल असा एकच प्राणघातक अचानक हल्ला एक समयावच्छेदेंकरून चढविणें. क्षणाक्षणाला ब्रिटिशांची सावधगिरी व तयारी वाढत होती. उशिरा कां होईना, पण जेथें जेथें उठाव झाला तेथें तेथें तो एकदम झाला असता, तर ब्रिटिश सत्ता निःसंशय खुळी झाली असती. एवढ्या प्रचंड उठावासाठीं एकसूत्रीपणाची फार जरूरी होती. पण पाहिजे तेवढा एकसूत्रीपणा नसतांना प्लासीच्या लढाईस शंभर वर्षें पूर्ण होतांच बावीस जून रोजीं निश्चित उठाव करावयाचा असें ठरलें असतांना मिरतचे लोकांनीं बंडाची तयारी पूर्ण होण्याच्या आंतच मेच्या दहा तारखेस बंडाचा झेंडा उभारला. या अवेळीं केलेल्या उठावामुळें नेत्यांनीं ठरविलेल्या बंडाच्या योजनेंत फार घोटाळे निर्माण झाले. तयारी अपुरी असतांना केलेल्या उठावामुळें फक्त शत्रूपक्षालाच मदत होते हें आतां अनुभवानें आमच्या चांगलेंच ध्यानांत आलें आहे. बंडाच्या ठरलेल्या कार्यक्रमांत घोंटाळा होतांच ब्रिटिश सत्तेला कमजोर कर-

ण्यासाठीं बंडाची व्याप्ती वाढविणें व वेळेच्या घोंटाळ्याचा तोटा भरून काढणें हा एकच उपाय राहिला. ब्रिटिशांना परिस्थितीच्या धोक्याची चांगलीच जाणीव होती. कॅनिंग म्हणाला होता, कीं, "शिंदे जर बंडवाल्यांना सामील झाले तर मला उद्यां चंबूगवाळे आवरावें लागेल." पण शिंदे बंडांत सामील झाले नाहींत, इतकेंच नव्हें तर पुष्कळ राजांनीं ब्रिटिशांचे बाजूस धांव घेतली.

राजे लोकांनीं ब्रिटिशांविरुद्ध दोन कारणामुळें उठाव केला नाहीं. १८३४ नंतर कंपनीनें असें जाहीर केलें होते कीं गादीचा वारसा कंपनीचे हुकुमाशिवाय कोणासही दिला जाऊं नये. "कंपनीशीं केलेल्या तहाच्या अटी कसोशीनें पाळतील असेंच लोक गाद्यांवर यावे असा याचा उद्देश दिसतो."[1] वारशाचे बाबतींत कारवाई करून जवळजवळ सर्व गाद्यांवर कमजोर राजे बसविले होते. साम्राज्य सरकारनें बऱ्याच ठिकाणीं मुख्य मंत्र्यांसच गादीवर बसविलें ( उदा. बडोदा हा एक त्यांना तहाच्या अटीमुळें प्राप्त झाला.) बंडाचे सुरवातीस हैदराबाद आणि ग्वाल्हेर या महत्त्वाच्या संस्थानांत सालेरजंग आणि दिनकरराव हे ब्रिटिशांनीं नेमलेले मुखमंत्री होते. ते आपल्या राजांस मुठींत ठेवून ब्रिटिश सत्तेबरोबर सहकार्य करावयास लावींत. ज्यांना ब्रिटिशांनीं गादीवर बसविले होते, त्यांना असें वाटे कीं, ब्रिटिशांची सत्ता टिकविण्यावरच आपलें अस्तित्व अवलंबून आहे. बंड यशस्वी झालें असतें तर, कांहीं संस्थानिकांना प्रतिस्पर्धी निर्माण होऊन त्यांच्याशीं झगडावें लागले असते. पण ब्रिटिशांचे पंखाखालीं जातांच त्यांना संरक्षण मिळालें. रेसिडेंटनें या वरील युक्तिवादावर फार

1 The Canbridge History of India pp vi 491.

भर दिल्यामुळें शिंदे ब्रिटिशांचेच बाजूस राहिले. याशिवाय त्यांचा दरबार आणि सैन्य ब्रिटिशांना अनुकूल होते हें वेगळें कारण होतेच. राजे लोकांचे ब्रिटिशांविरुद्ध एकच मोठे गाऱ्हाणें होते. ते म्हणजे ब्रिटिशांनीं दत्तकास केलेली बंदी, व त्यामुळें त्यांचे हातून गादी जाण्याचा निर्माण झालेला संभव. पण बंड सुरू होतांच लॉर्ड कॅनिंग यांनीं हा हक्क त्यांना कायमचा देण्यांत आला आहे. असें त्यांना खाजगीरित्या आश्वासन दिलें.[1] मुत्सद्दीपणाच्या या यशस्वी कारवाईमुळें संस्थानिक ही ब्रिटिश सत्तेची ढालच बनली.

बंडाचे नेतृत्व करणारी शक्ति आपसांतील भेदामुळें कमजोर होईल अशी धास्ती वाटत होती. ज्यांचें भांडवल गुंतलें होते त्यांना संकटाचा आणि अराजकतेचा लोंढा अंगावर आल्यासारखें वाटलें. गुंतलेलें भांडवल अवाढव्य तर होतेंच, पण त्याचें सर्व भवितव्य ब्रिटिशांवर कसें अवलंबून होते हें खालीं दिलेल्या जमिनमहसूलाच्या एकूण हिशेबावरून ध्यानांत येईल.

| | |
|---|---|
| संस्थानें | १३,०००,००० पौंड |
| सारा माफीची जमीन | ९,०००,००० पौंड |
| कायमधारा पद्धतीमुळें ताब्यांत आलेली | २,०००,००० पौंड |
| राजकीय पेन्शनें व नेमणुका | २,९००,००० पौंड |
| | २२,९००,००० |
| ब्रिटिश हिंदुस्थानांतील जमिनमहसूल | २९,९००,००० पौंड |
| | एकूण ४७,८००,००० |

1 S. C. Macpherson; Memorial of Service in India P. 311.

जमिनमहसूलाचा निम्मा भाग ब्रिटिशांच्या हिंदी सैन्याच्या एका तळासाठीं खर्च झाला. बंगालमधील कायमधारा पद्धतीचें मंडन करतांना लॉर्ड विल्यम बेंटिंक यांनीं म्हटलें आहे कीं, कायमधाऱ्याच्या पद्धतींत मूलभूत अशा कांहीं चुका व इतर कांहीं उणीवा असल्या तरी विस्तृत आणि भयंकर स्वरूपाच्या जनतेच्या बंडाविरुद्ध सुरक्षितता निर्माण करण्यासाठीं व ब्रिटिश राज्य सुरळीतपणें चालविण्यासाठीं जमिनदारांचे हितसंबंध निगडित करण्याचे दृष्टीनें ही पद्धत अंमलांत आणणें फार फायदेशीर होईल.[2]

मेहताबचंद्र या बरद्वानच्या महाराजांनीं बंगालमधील जमिनदारांचे वतीनें केलेल्या एका भाषणांतील ( डिसेंबर १८९७ ) खालील उताऱ्यावरून वरील उद्देश संपूर्णपणें कसा सफल झाला हें ध्यानांत येईल.

" बंगालमधील पुरुष, बायका, मुलें ब्रिटिश राजवटीशीं इतकी एकरूप झाली होती कीं, बंडवाले व ' भलत्याच ' मार्गास लागलेल्या त्यांच्या साथीदारांनीं हातीं सांपडलेल्या ब्रिटिशांस जो त्रास, त्यांचेवर जे जुलूम व अन्याय केले तेंच त्यांचेवरही करण्यांत आले. "

गुंतलेल्या भांडवलामुळें ब्रिटिश लोकांना जो पाठिंबा मिळाला तो नष्ट करण्यास एकच उपाय होता. या एकत्र झालेल्या सत्तेविरुद्ध

---

2 Between 1793 and 1857 cultivated area in Bengal increased from 30 to 70 Million Acres, while the land revenue increased only £ 60,000. The gains of the land Lords in the period amounted over £ 140, 000,000.

शेतकऱ्यांना संघटित करून त्यांचा उठाव करणें, बंडाचें नेतृत्व जमिनदार इनामदारांकडे असल्यामुळें अशक्य झालें. जाहीरनाम्यांत जमिन कसणारे किसान सोडून सर्व वर्गाचे लोकांना बंडांत भाग घेण्यास आवाहन करण्यांत आले होते. सुस्थितीचे व सुबत्तेचे आश्वासन किसांनाव्यतिरिक्त सर्वांना देण्यांत आले होते. किसानांपुढें मात्र जखडले जाण्याचे व जास्त पिळवणुकीचे चित्र उभे होते. किसानांची संघटना करतां आली नाहीं, यावरूनच बंडवाल्यांना अपयश येऊन त्यांचा कार्यनाश होणार हें ठरल्यासारखें होते.

औध, रोहीलखंड, दुआब, येथील शिपाई बंडांत सामील झाल्यामुळें जनतेचा असंतोष व पाठिंबा या दोन्ही गोष्टी स्पष्ट झाल्या. घोडदळामध्यें रोहीलखंडांतल्या मुसलमानांची भरती होती. पायदळांत औध दुआबमधील हिंदु होते. औध ब्रिटिश राज्यास जोडला गेल्यापासून बंड सुरू होईपर्यंत या इलाख्यांतील ७९,००० सैनिकांकडून ब्रिटिश सरकारानें बसविलेल्या डोईजड साऱ्याविरुद्ध १४,००० अर्ज रुजूं झाले होते. व शिपायांना होणाऱ्या कष्टांचे पडसाद साहजिकच लोकांत उठत. तेव्हां या इलाख्यांतील उठाव हा खरोखर सर्व जनतेचा उठाव होता.

मद्रास आणि मुंबईकडच्या शिपायांनीं बंडाचे हांकेस ओ दिली नाहीं. त्यांची भरती, बंगाल आर्मीप्रमाणें झालेली नव्हती. या प्रांतामध्यें सैन्याची भरती खालच्या वर्गांतून झालेली होती. बंगालमधील रेजिमेंटमध्यें ४०० ब्राह्मण, २०० मुसलमान व २०० खालच्या वर्गाचे हिंदु होते. वर उल्लेखिलेल्या अर्जाच्या संख्येवरून असें वाटतें कीं, आज आपण ज्यांनां ‘ कुलाक ’ म्हणतो, त्यामधून

औधमधील शिपायांची भरती झाली होती. बनारस आणि बुंदेलखंडांमधील जमिनदारामध्यें ब्राह्मण आणि रजपूत यांचें असेंच वर्चस्व होतें. बंडाचें आवाहन फक्त वरच्या दर्जाचें जमातींना केलेलें होतें. म्हणूनच सर हेन्री लॉरेन्स यांनीं मोठ्या कावेबाजपणें लॉर्ड कॅनिंगला असें आश्वासन दिलें होतें कीं, " पासी ( अस्पृश्य ) लोकांची फौज घेऊन मी औधचें संरक्षण करूं शकेन. " १८५७ च्या आक्टोबरमध्यें बीडननें विल्यम म्युइर यांना असें लिहिलें आहे कीं, " आपणास खालच्या जातींवर अवलंबून राहावें लागेल. " मद्रास आणि बंगालमधील सैन्य खालच्या जातींचें असल्यामुळें त्यांचेवर ' कुटुंबपद्धती ' लादतां आली. " मद्रासमधील रेजिमेंटस्‌मध्यें कुटुंबपद्धतीमुळें सरकारचा फौजेवर चांगलाच ताबा राहतो व ही कुटुंबें मागें मद्रासमध्यें राहिल्यामुळें तर विशेषच " असें कॅनिंगनें म्हटलें आहे. बायकामुलांची सैनिकांबरोबर लष्करामध्यें राहण्याच्या कुटुंबव्यवस्थेमुळें खेडेगांवांतील इतर लोकांशीं संबंध बंगालमधील सैन्याचे मानानें जिव्हाळ्याचे नव्हते.

पदच्युत राजे, पडित सरदार, उखडून काढलेल्या इनामदाऱ्या यांचे हितसंबंध हींच बंडाची शक्ति होती. ब्रिटिश सत्तेची खोल रुजलेली पाळेमुळें खणून काढणें या शक्तिला शक्य नव्हतें. शिवाय कांहीं हिंदी लोकांचा ब्रिटिशांना पाठिंबा होताच. ज्या लोकांना ही सत्ता उखडून टाकणें शक्य होतें त्यांना बंडाच्या तत्त्वप्रणालीप्रमाणें आवाहनच करतां येत नव्हतें. एकमेकांविरुद्ध असलेल्या अंतर्गत वादांमुळें बंडाला अपयशाचा विळखा पूर्वींच पडला होता.

# बंडाचे परिणाम : : ८

१८६० सालीं बंडाचा पूर्ण बींमोड झाला होता. पण त्याच्या खोल जखमा मात्र कायम राहिल्या होत्या. आमच्या राष्ट्रीय वृत्तीस बंडानीं कांहीं वेगळेंच वळण लावलें.

बंडामुळें हिंदी व युरोपियन लोकांच्या संबंधांत मोठी फट पडली. व्यावहारिक, सांस्कृतिक घसट होणेंमुद्धां कठीण होऊन बसले होते. तैलचित्रें व चित्रें यांमधूनसुद्धां हिंदुस्थानासाठीं चेहऱ्यावर दयाक्षमा-विरहित क्रूरभाव मुकर झाला. इंग्लिश शिपायांचे मनांत त्यांचे बाजूनें लढणाऱ्या हिंदी शिपायांचेबद्दलमुद्धां तुच्छभाव निर्माण झाला. हिंदी लोकांना आत्मा असल्याचेंसुद्धां ते नाकारीत आणि अगदीं नाईलाजानें म्हणत कीं, " या काळ्या लोकांना आत्मा असलाच तर तो आमच्यासारखा खास नाहीं. " द्वेष ही फार भयंकर भावना आहे. एकमेकांबद्दल कधींही विश्वास निर्माण होऊं शकणार नाहीं इतका दूरभाव बंडामुळें निर्माण झाला आहे हे डब्ल्यू. एच. लॉरेन्स यांच्या फार लौकर ध्यानांत आलें. पुढील तीस वर्षांच्या इतिहासाची नासाडी करणारें निळीबद्दलचें बिल, वा रड, फुलर आणि इलबर्ट बिल याबाबत झालेलें किळसवाणें वाद पाहिले म्हणजे रसेलचें निराशावादी भविष्य खरें होते असें वाटतें. फांशी देण्याच्या गळ-फांसाच्या दोऱ्या जरी तोडून टाकल्या होत्या, तरी पूर्वग्रहांचे विळखे जीव गुदमरून टाकीत होते.

तसेंच बंडाचा पाडाव झाल्यामुळें हिंदु-मुसलमानांत गैरसमजाचें पेंवच फुटलें होते बंडाबाबतची मुसलमानांची निष्ठा जास्त खोल होती व

ती दर्शविणारा मुसलमान समाज जास्त विखुरलेला होता. दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमानांची संख्या कमी आणि तीही विरळ असून १८५७ ते ५९ पर्यंत तेथें त्यांचे कितीतरी गुप्त कट उघडकीस आले. पळून जाऊन आसरा घेतलेल्या ब्रिटिश लोकांचे अहवालांत खालील आशयाचे बरेंच उल्लेख सांपडतात. "तें हिंदु लोकांचें खेडेगांव असल्यामुळें तेथें जाण्यास आम्हांस भीति वाटली नाहीं." सर्व हिंदु लोक फिरंग्यांचे बाबतींत दयार्द्र वृत्ती दाखवीत पण मुसलमान लोकांना त्यांची खुनी भावना लपवितां येत नसे.[1]

बंड सुरू झालें तेव्हां असंख्य हिंदु व मुसलमान बंडांत सामील झाले, पण ऐतिहासिक आणि तात्त्विक कारणांनीं त्यांचा विरोध हिंदूंपेक्षां अधिक तीव्र असे. शाह वलि उल्लाचे शिकवणीमुळें ब्रिटिश सत्तेखालील हिंदुस्थान बऱ्याच मुसलमानांना दार–उल–हारब् वाटे आणि या परक्या राज्याविरुद्ध 'जेहाद' करणें हें नुसतें राजकीय नव्हे तर एक धार्मिक कर्तव्य होतें. म्हणून गरीब समजले गेलेल्या हिंदूंपेक्षां जहाल व तापट मुसलमानांची ब्रिटिशांना जास्त भीति वाटे.

दडपशाहीखालीं मुसलमान चांगलेंच भरडून निघालें. भीति हाडीं-मासीं खिळली. त्यांच्या ज्या नेत्यांना फांशी देण्यांत आले वा हद्द-पार करण्यांत आले त्यांत झाजार, बाल्लपगड, फरूकनगर, फरूकाबाद येथील नबाबही होते. (१८ नोव्हेंबर १८५७). "काल सकाळीं चोवीस शाहजाद्यांना फांशीं देण्यांत आले. यापैकीं दोघे राजाचे मेहुणें, दोघे जांवई व राहिलेले भाचे पुतणे वगैरे होते."[2] मुसल-

1 Ball. op. cit. P. ii 92-97.

2 Sir Williams Muir: Indian Mutiny N. W. P. Intelligence Record P. i 273.

मानांच्या राहण्याच्या ठिकाणावर अचूक जुलूम जबरदस्ती केली जाई. उदा०, जनरल नीलनें मि. रेनो यांना पाठविलेल्या सूचना अशा होत्या. " फतेपूर शहरानें उठाव केला आहे. त्यावर हल्ला करून पठाण वस्तीचा तेथील लोकासह नाश करावा. " मुसलमानांची घरेंदारें मोठ्या प्रमाणांत जप्त करण्यांत आली. दिल्ली शहर पुन्हां ताब्यांत घेतल्यावर हिंदूंना फार थोड्या अवधींत परत येण्यास परवानगी देण्यांत आली. पण मुसलमानांना मात्र परवानगी दिली नाहीं. इतकेंच नव्हें तर त्यांच्या घरांवरील जप्त्या १८६९ पर्यंत उठल्या नाहींत. दिल्ली विभागांत मुसलमानांचेकडून मालमत्तेच्या एकचतुर्थांश कर वसूल केला गेला. हिंदूकडून मात्र एकदशांशच कर घेण्यांत आला.

राज्यकर्त्यांच्या रागाचा विशेष रोख मुसलमानांचेवर होता. कॅप्टन–पुढें फील्ड मार्शल झालेले–लॉर्ड रॉबर्टस यांनीं लिहिलें आहे." देव-दयेनें ब्रिटिश लोक पुन्हां हिंदुस्थानाचे मालक बनतील हें या हलकट मुसलमानांना पटवून दिलें पाहिजे. " जेत्यांच्या जळजळीत सूडाच्या आगींत दोषी आणि निर्दोषी, सगळेच होरपळून निघाले. मुसल-मानांच्या हालअपेष्टांना कांहीं अंतच राहिला नाहीं. सय्यद अहमद खां सारख्या राजनिष्ठ मनुष्याच्या घरांतीलसुद्धां माणसें मारली गेली आणि त्यांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.[1] गालिबच्या पत्रांत भीति आणि औदासीन्य यांचे वर्णन केलें आहे कीं, " शहर सहारा हो गया ( शहराचे ओसाड वाळवंट बनले ). उर्दू बाजारच नाहींसा झाला मग उर्दूची काय कथा. दिल्ली हे आतां शहर न

1. G. F. I. Graham : Syd Ahemad Khan P. 27-8.

राहतां तो एक सैन्याचा तळच बनला आहे. महाजन (हिंदु व्यापारी) अजून दिसत आहेत. पण सुखवस्तु मुसलमानांचेपैकीं फक्त तिघेच दिसतात. इतके आप्तेष्टमित्र मेले आहेत कीं आज जर मी मेलो तर मागें रडावयासमुद्धां कोणी शिल्लक नाहीं." खालील उताऱ्यावरून त्यावेळीं निर्माण झालेली जीविताची अशाश्वती ध्यानांत येईल. "दिल्लीच्या आम कत्तलींत हकीम राझीउद्दीन यांना गोळी घालून ठार केले. अहमद हुसेन खां आणि त्यांचे धाकटे बंधु हेही आजच मारले गेले. दिल्लीस आलेले तल्यारखांचे दोन्ही मुलगे 'गद्दर' मुळें टोंकला परत जाऊ शकले नाहींत. त्यांना आज फांशी देण्यांत आले."[१]

मुसलमानांनीं अनेक हालअपेष्टांना तोंड दिलें. पराभव मान्य न करतां असंतुष्ट राहिल्यामुळें त्यांनीं वेगळ्या स्वरूपांत प्रतिकार चालू ठेवला होता. वायव्य सरहद्दीवरील लढाया आणि जागोजागीं सुरू असलेले कट या दोन्हींची केंद्रें सिताना आणि पाटणा या दोन्ही ठिकाणीं होती. इंग्लिश शिक्षण घ्यावयाचें नाहीं असें ठरविल्यामुळें त्यांना धंदा व सरकारी नोकरी यांत स्थान राहिलें नाहीं. नव्या परिस्थितीशीं जुळते घेऊन, हिंदी लोक पाश्चात्य कल्पना स्वीकारीत होते. तेव्हां मुसलमान पूर्वापारच्या विश्वासांत आणि परंपरेंत गुरफटून राहिले. दिल्लीमध्यें मुसलमानांच्या होऊं घातलेल्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा पाया बंडानें उखडून टाकला. १८९८ मध्यें 'कलकत्त्या-रिव्हयू'त खालील वृत्त आलें आहे.

"मी पांच वर्षांपूर्वी दिल्लीस गेलो होतो आणि तेथें मुसलमानांचे छापखान्यांतून चाललेले अवाढव्य काम पाहून मला अतिशय आश्चर्य

---

1 Ghalib : Ood-i-Hind, Passim.

वाटले. या कार्यास दिल्लीच्या धुमश्चक्रींत जो धक्का बसला त्यानंतर या कामानें कधींच वर डोकें काढले नाहीं. संस्कृतीचा हा फुलोरा कोळपून गेला. संस्कृतीची जोमानें होऊं लागलेली ही वाढ एकदम कशी खुंटली हें सांगणें फारसें कठीण नाहीं. शैक्षणिक पुनरुज्जीवनावर बंडामुळें नाशाची धाड पडली आणि पुन्हां त्यांतून मार्ग निघालाच नाहीं."[1]

कलकत्ता या हिंदु संस्कृतीच्या केंद्रास बंडाचा धक्का तर लागला नाहींच पण शारीरिक आणि मानसिक हालअपेष्टांची झळही लागली नाहीं.

अशा तऱ्हेनें या दोन धर्मांमध्यें असा कांहीं भेद निर्माण झाला कीं जणू काय हिंदुस्थानाची दोन छकलेंच झाली. बंडानंतरच्या घटनांमुळें दैनंदिन आयुष्य बिघडविणारे विद्रूप धार्मिक वाद मात्र शिल्लक राहिले.

बंड सुरू होतांच ईस्ट इंडिया कंपनी संपुष्टांत आली. दैवयोगानें ज्यावेळीं तैमूरचे शेवटचे वारस इतिहास भूमीवरून नाहींसे झाले त्याच वेळीं ईस्ट इंडिया कंपनीही लुप्त झाली.

ब्रिटिशांनीं हिंदुस्थानचा राज्यशकट चालविण्याची जबाबदारी घेतांच त्यांचे मनांत पुन्हां बंड होऊं म्हणून काय करावे लागेल हा विचार प्रथम आला. सैन्याचें पुनर्संघटन करण्यांत आलें, व ब्रिटिश सत्तेचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला गेला.

आर्मी कमिशननें लिहिलें आहे ( १८७९ ); " बंडानें दिलेल्या धड्यामुळें दोन तत्त्वांचा अवलंब करावयास हवा. हिंदुस्थानांत प्रभावी

---

1 C. F. Andrews : Zakaullah of Delhi P. 38.

गोरी फौज ठेवणें व दारुगोळा व तोफखाना त्यांचे हातांत ठेवणें. इंडियन आर्मीच्या पुनर्संघटनेसाठीं नेमलेल्या पील कमिटीनें असें सुचविलें आहे कीं सैन्यामधील युरोपियन आणि हिंदी लोकांचे, एकास पांच हें प्रमाण बदलून, बंगालसाठीं एकास दोन व मुंबई–मद्राससाठीं एकास तीन हें प्रमाण असावें. हिंदी फौजेची संख्या निम्मी करण्यांत आली; एकंदर ७७ रेजिमेंट्स बंद करून राहिलेल्यांची संख्या प्रत्येकीं ६०० सैनिकांवर आणली गेली. कामावरून दूर केलेल्यांची संख्या मिलिटरी पोलिसांसुद्धां जवळ जवळ दोन लाख होती. प्रत्येक युरोपियन शिपायासाठीं होणारा खर्च एका हिंदी शिपायाचे खर्चाच्या चार ते पांचपट असे. त्यामुळें या पुनर्संघटनेनें फौजी अंदाजपत्र वारेमाप फुगले. शिवाय युरोपियन सैन्य स्थाईक सैन्य म्हणून हिंदुस्थानांत ठेवावयाचे नव्हते. लॉर्ड कॅनिंग यांनीं लिहिले आहे. (१८५९) "मला खात्रीनें वाटू लागले आहे कीं, युरोपियन सैन्य हिंदुस्थानांत स्थायी करून ठेवणें धोक्याचें आहे. मधून मधून विलायतेस जाऊन सैन्यांतील सर्व रेजिमेंट्सच्या शिस्तीस आणि राजनिष्ठेस उजळा देणें अत्यंत आवश्यक आहे. कोठल्याही कारणानें याकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं." एकाही युरोपियन शिपायास हिंदुस्थानांत राहण्याची संवय लागता कामा नये हिंदुस्थानवर हुकूमत चालविणाऱ्या सैन्याचा आपण एक घटक आहोंत याचा त्याला विसर पडता कामा नये. १८६१ च्या आर्मी अमलगमेशन स्कीमनें ही सूचना अंमलांत आणली. त्यामुळें हिंदुस्थानची शिल्लक तर खर्च झालीच पण डोक्यावर आणखी एक आर्थिक ओझें चढलें.

सैन्याची ठाणीं, मोक्याचीं ठिकाणें, मुख्य खजिने, दारुगोळ्याचीं

कोठारें, किल्ले वगैरे सर्व दुपटीनें वाढविलेल्या युरोपियन सैन्याचें ताब्यांत दिलें. " फौजेच्या प्रत्येक मोठ्या ठिकाणीं जरी आतां बंड झालें तरी त्याला तोंड देऊं शकतील इतकें गोरे सैन्य प्रत्येक ठिकाणीं आहे," असें सर रिचर्ड टेंपल यांनीं लिहिले आहे. वायव्य सरहद्द प्रांत सोडल्यास कोठेंही हिंदी सैन्याच्या हातांत तोफखाने नव्हते. ब्रिटिश सैन्याच्या रॉयल आर्टिलरीमधील बहुतेक सैनिक तोफखान्यावरच काम करीत.

नव्या हिंदी फौजेंतून वरिष्ठ जातींना वगळले होते. ब्राह्मणांच्या सैन्यांत धार्मिक आणि सैनिक नेतृत्त्वाची सांगड होत असे ती कायमची फोडण्यांत आली. खालच्या जातीचे हिंदु, गुरखे, शीख, सरहद्दीवरचे पठाण यांचीच भरती सैन्यांत करण्यांत येई.

बंगाल आर्मीमध्यें ८२,००० पंजाबी लोक भरती होऊन ती खरीखुरी पंजाब आर्मी बनली. नवें सैन्य; विभागणी आणि समतोलपणा या दोन तत्त्वांवर उभारण्यांत आलें होते. सर जॉन लॉरेन्स, नेव्हिल चेंबरलेन, हर्बर्ट एडवर्ड्स, यांनी असें सुचविलें कीं, " हिंदी सैन्याविरुद्ध पुरेसे युरोपियन सैन्य ठेवून समतोलपणा राखण्याच्या खालोखाल हिंदी विरुद्ध हिंदी सैनिक असा समतोलपणा राखणें हाच हिंदी सैन्याच्या सुरक्षिततेचा उपाय आहे. हा उद्देश साधण्यासाठीं हिंदुस्थानांतील सर्व सैनिक जमातींना एकत्र आणून त्यांचें सर्वसाधारण सैन्य तयार करणें हा मार्ग ताबडतोब सुचतो. पण प्रथमदर्शनीं जरी ही योजना चांगली वाटली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत ती तेवढी फायदेशीर ठरत नाहीं. वेगवेगळ्या जातींचे लोक अशा तऱ्हेनें जर एकत्र आणले तर, त्यांच्यांतील परकेपणाची भावना व पूर्वग्रह नाहींसें

होतात व सलोखा वाढतो, व अशा तऱ्हेनें त्यांना एकत्र आणण्याचा हेतूच निष्फळ होतो असें आढळून येते. भेदभाव जर कायम राखता आले, तर एका प्रांतांतील मुसलमान, दुसऱ्यां प्रांतांतील मुसलमानांनासुद्धां भितात, त्यांचा द्वेष करतात, तेव्हां हें उपयुक्त ठरलेले भेदभाव कायम टिकविण्यासाठीं यापुढें सैन्यांत भरती करताना प्रांतांच्या भौगोलिक मर्यादा कायम राखूनच भरती करावी. त्यामधील लोकांचे भेदभाव आणि द्वेष तीव्रतर स्वरूपाचें असतात." पील कमिटीनें ही सूचना मान्य केली आणि सैन्याचे विभागणीचें बाबतींत काटेकोरपणानें हेंच धोरण ठेवलें. सैन्य हें जनतेच्या हातांतील शस्त्र कायमचें हिरावून घेतलें गेले.

"तुम्ही शिपायांचेकडून जनतेला ठेंचलेत व आतां खुद्द शिपायांना ठेंचता आहांत, आतां तुमच्याशीं लढावयास हिंदुस्थानांत कोणी उरले नाहीं." असें एक बंडखोर शिपाई म्हणाला.

नुसत्या सैन्याची पुनर्घटना करून हिंदुस्थानांतील ब्रिटिशांची सत्ता पुरेशी सुरक्षित होणार नव्हती. राजसत्तेचा पाया यापेक्षां जास्त मजबूत करणें जरूर होते. राणीच्या जाहीरनाम्याचा शाब्दिक फुलोरा छाटून टाकला कीं, हिंदुस्थानांतील प्रतिगामी प्रवृत्तींना पाठिंबा देऊन हिंदुस्थानांतील पाया पक्का रोंवतां येईल, असा स्पष्ट अर्थ निघतो.

"बंड संपतांच ब्रिटिश सरकार आणि सरकारी नोकर यांचे मनांत प्रतिगामी विचारांची एक लाट आली"[1] असें सर जॉन स्ट्रॅची लिहितात. "बंडाचा मोड करण्याचे कामीं राजे लोकांनीं फार मोठी मदत केली. त्यांनीं जर अडथळा केला नसता तर हा पाण्याचा लोंढा खास

1 J. Strachey : India P. 250.

आमच्या डोक्यावरून गेला असता. ब्रिटिश साम्राज्यशाहीची तटबंदी म्हणून त्याना कायम राखणें हें ब्रिटिशांच्या राजकीय धोरणाचें मूलतत्त्व ठरलें आहे."[1] राजानांच नव्हें तर जमिनदारांनाही ब्रिटिशांनीं आपल्या पंखाखालीं घेतले होते. दिल्ली सरकारनें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांना लिहिले आहे कीं, "हिंदुस्थानांत जमिनदार इनामदारांचा मोठेपणा राखणें ही इतकी महत्त्वाची गोष्ट आहे कीं, त्यासाठीं एखाद्या गोष्टीचा बळी द्यावा लागला तरी चालेल." कॅनिंगसाहेबानें त्यांचेबद्दल, "वंश, वास्तव्य, वा कतृत्व याबद्दल कसलीही पात्रता नसलेलें" असे उद्गार काढले आहेत. परंतु याच लोकांनीं बंडांत भाग घेतला होता ही गोष्ट दृष्टीआड करून "ब्रिटिशांना आवश्यक असे ते समाजघटक आहेत" या गोष्टीवर ब्रिटिशांनीं भर दिला व त्यांना नागरिकत्वाचें सर्व हक्क पुनश्च बहाल केले. इतकेंच नव्हे तर त्यांना १८५६ पेक्षांही अधिक सवलती देऊन त्यांची मालमत्ता परत करण्यांत आली. अशा तऱ्हेनें जमिनदारी पद्धतीची पुनर्स्थापना तर झालीच. पण तिची व्याप्ती कशी वाढेल यांचाही खल झाला "१८५८–६२ या काळांत हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्येंही हा विषय चर्चिला जात होता."[2] बंडामुळें निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीमुळें सरकारला ही कल्पना सोडून द्यावी लागली. आणि जमिनदारांबाबतचा हा चांगुलपणा, स्वतःची गैरसोय सोसून नव्हें, तर शेतकऱ्याचा बोजा वाढवून, सरकारला दाखवावयाचा होता. मध्यप्रांतांतील, बंडाची

1 P.E. Roberts : India P. ii 388.

2 H. S. Cunningham : British India and its Rulers P. 162.

(८५८) इ.नं. ६८ दि. ९.७०

झळ लागलेल्या सांबळपूर आणि इतर जिल्ह्यांत मालगुझारी पद्धत याच सुमारास अंमलांत आली. अशाच प्रकारें लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशी पंजाबांतील नुसत्या एका विभागांतील ४६,००० वंशपरंपरागत शेतकरी कुळांपैकीं तीन चतुर्थांशाहूनही अधिक शेतकरी 'खंडकरी' बनले. यामुळें अर्थातच अशा शेतकऱ्याचे अस्तित्व जमिनदारांचे लहरीवर अवलंबून राहिले कारण त्यामुळें तो शेतकऱ्याकडून केवढीही खंडणी उकळू शकला असता वा त्याला केव्हांहीं घालवून देऊ शकला असता. तालुकदारांना दिवाणी आणि फौजदारी न्यायदानाचे हक्क देण्यांत आले. सरकारनें जमिनदार इनामदारांची गाडी रुळावर आणून ठेवली. परक्या सत्तेविरुद्ध जमिनदार इनामदारांचा उठाव, त्यांचे हातीं सत्ता येतांच नाहींसा झाला. सामाजिक बदलांचें तत्त्वज्ञान हें असें आहे. डलहौसीनें बुडित परंपरेंत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[१] सरकारचें, राजकीय प्रतिगामी मतवाद्यांबद्दल जें धोरण होते, तेंच सामाजिक सुधारणेच्या आड येणारांचे बाबतींत. बुडित परंपरा व पाश्चात्य सुधारणा यांत जमिन–अस्मानाचे अंतर होते. पण बंड संपतांच सुधारणेकडचा कल परंपरेकडे वळविण्याचा यत्न झाला. स्त्री–शिक्षण, व बहुपत्निकत्वाविरुद्ध प्रचार, या पुरोगामी गोष्टींकडे सरकारनें जाणूनबुजून दुर्लक्ष केलें. पंडित विद्यासागरांनीं विधवाविवाहाबाबत कायदा पास करून घेतला. पण वजनदार लोकांचा पाठिंबा न मिळाल्यामुळें बहुपत्निकत्वावर आळा घालणाऱ्या बिलाचें (१८६३) कायद्यांत रुपांतर होऊं शकलें नाहीं. १८५७ सालीं झालेल्या भयं-

1 H. S. Cunningham : Earl of Canning P. 10.

कर प्रकारापासून, हिंदी चालीरीतींत बदल करण्याबाबत राज्यकर्त्यांच्या मनांत भीति निर्माण झाली आहे असें सर हेन्री मेन यांनीं म्हटलें आहे. लेपेल ग्रिफिन व जेम्स केर यांनीं जातीय वाद राष्ट्रीय संघटनेविरुद्ध आहे म्हणून त्यास पाठिंबा देण्याचा उपदेश केला.

बंडाचे आर्थिक परिणामही फार महत्त्वाचे होते. डॉ. बुकानन[१] यांनीं या बंडाचें वर्गीकरण अफूचे बंड, अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध, अशा व्यापारविषयक युद्धांत केलें आहे. बंडाच्या काळापासून ब्रिटिशांनीं जास्त प्रांत काबीज करण्याचें धोरण सोडून दिले होते. त्यांचें लक्ष ब्रिटिश सत्तेचा आर्थिक पाया हिंदुस्थानांत भक्कम करण्याकडे लागले. "बंडापासून, साम्राज्यविस्ताराचें धोरण सोडून दिले व त्यानीं (ब्रिटिशांनीं) याच पंचवीस वर्षांत व्यापार मात्र भरमसाट वाढविला"[२] असें सर जॉन सीली यांनीं लिहिलें आहे. व्यापारातील वाढ शेंकडा ३६० या प्रमाणात झाली. हिंदुस्थान गुलाम राष्ट्र असल्यामुळें ब्रिटिशांचा येथील प्रांतविस्तार अमेरिकेंतील प्रांतविस्ताराप्रमाणें निर्धोक नव्हता, म्हणून येथील प्रांतविस्ताराचे परिणाम अमेरिकेंतील प्रांतविस्ताराच्या नेमके उलट झाले.

या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदलीमुळें कांहीं शक्तींना धक्का पोंचून त्यापुढें धोक्याच्या ठरतील अशी ब्रिटिशांना धास्ती वाटली. बंडाबरोबर जुना हिंदुस्थान रसातळास गेला. सरकारनें पाश्चिमात्य देशांतून येणाऱ्या ज्ञानाच्या ओघानें जोर धरणाऱ्या नव्या हिंदु-

---

1 D. B. Buchanan: Development of Capitalist Enterprises in India P. 129.

2 Seeley: Expansion of England P. 313.

स्थानचीच सरकारला भीति होती. सरकारनें पुरोगामी बिळांची गळचेपी केली. श्रीमंत आणि प्रगतीच्या आड येणारे लोक सरकारचे बगलबच्चे बनले. अशा तऱ्हेनें सरकारचें धोरणांत मोठा बदल घडून आला.

१८५७ सालचे बंड केवळ 'शिपायांचें बंड' नव्हतें. तो जनतारूपी ज्वालामुखीचा स्फोट होता. व त्याबरोबरच धुमसत असलेल्या बऱ्याच असंतोषाची आग बाहेर पडली. या स्फोटानंतर समाजाच्या संपूर्ण स्वरूपांतच फरक झाला. बंडाच्या खोल जखमांचे वण मात्र अजून स्पष्टपणें कायम आहेत.

नगर वाचनालय
ता.
सातारा.